अल्जबार अल्जबार

अरबी शास्त्रज्ञांच्या सुरस आणि चमत्कारिक कथा



सुरेश मथुरे

अल्जबार

अल्जबार

अरबी शास्त्रज्ञांच्या सुरस आणि चमत्कारिक कथा

सुरेश मथुरे

मृण्मयी ऋग्वेदी प्रकाशन

मृण्मयी ऋग्वेदी प्रकाशन क्र. ६

प्रदीप गुर्जर
१, सुयोग, रामवाडी,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

२५ डिसेंबर, २००४

छपाई
मोहन खैरे
२१७, जयमल्हार, आशिष इंड. इस्टेट,
गोखले रोड (साउथ), मुंबई - २५

अक्षरजुळणी
डॉट कॉम, दादर
मोबाईल - ९८९२७२३९८०

मुखपृष्ठ/रेखाचित्रे
सुनील पुजारी
मोबाईल - ९८९२३३०८९४

सुरेश मथुरे
जन्म - १० एप्रिल १९३१
मृत्यू - २३ डिसेंबर १९९८

चि. सोहन आणि
चि. स्निग्धा
यांना....

- सुरेश मथुरे (आजोबा)

पर्यावरणाबद्दल विचार करणारा अल् हाझेन

अल् हाझेन: याअरब शास्त्रज्ञाचा जन्म-मृत्यू ९६५-१०३९ या सुमारास झाला असावा. हाझेन यांचा प्रकाशशास्त्राचा अभ्यास गाढा होता. त्यांनी तब्बीयात Study of things that change हे पुस्तक लिहिले. याशिवायही अनेक पुस्तके त्यांनी लिहिली.

भौतिक शास्त्रातील प्रकाशाचे सरळ रेषेतील गमन, पतन-परावर्तन कोनांचे एकत्त्व, छाय यंत्राचे- Camera - तत्त्व वगैरे गोष्टींशी त्यांचा परिचय होता. किंबहुना कॅमेराचे तत्त्व त्यांनी निश्चितच शोधले असे म्हणावे लागते. त्यांनी मानवी डोळ्याच्या निरनिराळ्या अवयवांना दिलेली अरबी नावे अजूनही तशीच वापरली जातात. यावरूनच त्यांच्या ज्ञानाचा प्रभाव किती शतके पडला आहे हे जाणवते.

परंतु त्यांनी जो महत्त्वाचा शोध लावला तो, 'पृथ्वीभोवती वातावरणाचा १० ते ३० मैलांचा आवरण पट्टा असतो' हा. पृथ्वीच्या या आवरण वाटीची कल्पना गेली कित्येक शतके शास्त्रज्ञांना आलेली नव्हती. अगदी अलिकडे, या शतकाच्या दुसऱ्या अर्धशतकापासूनच आपण पर्यावरण, प्रदूषण, ओझोन झोन, इकॉलॉजी वगैरे गोष्टींवर विचार करू लागलो आहोत.

प्रकाशाचे धूलीकरणांमुळे प्रवर्तन होते आणि या प्रवर्तनामुळे (स्कॅटरिंग) संधिप्रकाश आणि उष:काल होतात हे त्यांनी हेरले. इतकेच नव्हे तर, 'सूर्य क्षितिजाखाली १९ अंश गेल्यानंतर संधिप्रकाश मावळतो,' हे गणित त्यांनी दूरच्या ताऱ्याचे वेध घेऊन केले आणि पृथ्वीभोवतीच्या आवरण वाटीची जाडी काढली. आज ही आवरण वाटी ५० मैलांची असावी असे धरले जाते आणि तिला भगदाड, भोक वगैरे तर पडणार नाही ना, याकडे डोळ्यात तेल घालून पाहिले जाते. ओझेन वायूने पाडलेले एक भगदाड शास्त्रज्ञांची आजच डोकेदुखी झाले आहे. एवढा महत्त्वाचा हा शोध आहे.

अरबांनी प्रामुख्याने शास्त्रीय ज्ञान जतन करण्याचा प्रयत्न केला. केवळ त्यांच्या या मधुमक्षिका वृत्तीमुळेच विज्ञानाचा बोलका आराखडा आज मांडता येतो.

अल् हाझेन यांचा पर्यावरणाबद्दलचा शोध महत्त्वाचा वाटतो.

■

हे आक्रोडी कवच धरेचे...

हळूहळू अरबस्थानातील ते रुक्ष पठार ठार काळोखात बुडत जात होते. अजूनही काळोख पडायला सुरुवात झालेली नव्हती, पण ती होत होती.

सभोवार रक्तचंदनी संधिप्रकाश पसरलेला होता. सूर्य डोंगराआड डुबला होता आणि ताडा-माडाची-खजुरांची खुजी झाडे काजळशिल्पं बनत होती.

पण अशा या भेसूर-भयाण वेळी पठाराच्या टोकावर एकत्र जमलेली लहान, कोवळ्या वयाची काही शाळकरी मुले मात्र आपल्याच तंद्रीत डोळ्यासमोर नळकांडी धरून समोर उगवणाऱ्या नक्षत्रांचा वेध घेत होती. हे अजबच होते.

एका बाजूला एक छोटे, बसके टेपाड होते. ह्या टेपाडावर एखादी पर्णकुटी वगैरे असावी. निदान पाणपोयी असावी असेही दिसत होते. दिसत होते नव्हे या ठिकाणाकडे एक पांढऱ्या केसांचा धिप्पाड माणूस एका अत्यंत नाजूक लावण्यलतिकेला विळखून जातोय असेही दिसत होते. या लावण्यलतिकेचे काळेभोर, अमाप केस वाऱ्यावर भुरुभुरु उडत असलेले पाहून कुणालाही ती इफ्रिता-भूतयोनीतील असावी असे वाटल्यावाचून राहिले नसते. संध्याकाळच्या रक्तचंदनी काजळीने तिथे एक मोठीच किमया केली होती.

कुठेतरी खिस्-पिस् आवाज उमटला.

दूर दोन घोडे एका खजुरीच्या झाडाला बांधलेले होते. ते आवाज करीत होते. म्हणजे एकमेकांची अंगे चाटत समोर टाकलेले गवत खात होते. खोडाला बांधलेले दोरखंड ओढले गेले की खिस्-फिस् आवाज होत होता.

या आवाजानेच घाबरलेले दोन इसम एकमेकांकडे साशंक होऊन पहात होते. हे दोन इसम खुरट्या झुडुपाआडून एकदा ताऱ्यांचा वेध घेणाऱ्या मुलांकडे, तर दुसऱ्या क्षणी टेपाडावरच्या केस पिकलेल्या, तरुण मुलीला कवटाळत चालणाऱ्या माणसाकडे पहात होते. हिस्-फिस् आवाजाने एकदम दचकून जात होते.

एकाएकी एक इसम उठत म्हणाला, 'वजीरसाब, पाहिले ना हा सफेद बालवाला अल्-हाझन मास्तरडा काय करतोय ते!'

दुसरा इसम उठत उठत, अंग झटकत गंभीरपणे म्हणाला, 'पाहिले. अल्-हाझनने असे करायला नको होते!'

'अंऽऽ हंऽऽ ! त्याने काय करावे ते तो ठरवणार. सफेद बाल त्यांचे झालेत. पण या मास्तरड्याने आपल्या शिष्यांसमोर असे करावे ?'

इतक्यात वजीरसाब एकदम म्हणाले, 'अरे, तो बघ. त्या मुलीला मार्गी लावून अल्-हाझन आता मुलांमध्ये गेलाय...'

काय उपयोग! तो भले त्यांना ज्ञान देणारा असेल, कुराण शिकवणार असेल, पण मुलांपुढे त्याने तरुण मुलीला...' बोलता बोलता तो इसम गप्प झाला आणि एकदम काही आठवून म्हणाला, 'तर वजीरसाब, उद्या खलीफा दरबार भरवून या मास्तरड्याला फार मोठा किताब देणार आहे. का तर या मास्तरड्याने पिढीला ज्ञानामृत पाजले. पण सत्य तुम्ही आता जाणताच आहात'.

'ठीक आहे, ठीक आहे. खलीफाने दरबारात अल् हाझनचा पुकारा केला की मी तुला बोलायची संधी देईन. तू तुझे मत सांग. पण माझ्या कामाचे काय ?'

दुसऱ्या इसमाने आपल्या डगल्यात हात खुपसला आणि आक्रोडाएवढे गठडे दाखवून तो म्हणाला, 'तुमचा हिरा. खलीफाच्या मुगुटातला खरा हिरा. हा मी आताच द्यायला बाहेर पडणार होतो. माझ्या माहितीप्रमाणे आज किंवा उद्या उंटांचा काफीला बसऱ्याहून बगदाद शहरी येईल. या काफिल्याचा व्यापारी हिंदोस्थाहून जवानीचे चूर्ण घेऊन येईल...'

'नक्की ?'

'अलबत्! हा अल्-अरबनूर-अल् सलीम अल्लाशपथ खोटे बोलणार नाही. हिंदोस्थानाहून आणलेले चूर्ण फार महाग आहे. तीन डोळ्यांच्या रुद्राक्षाचे वाटण, एकाक्ष घुबडाची चरबी आणि कस्तुरीमृगाची सुगंधी गुटी एकत्र करून ते हिंदू साधूंनी तयार केलेले असते. हे साधू त्यात हिमालयातील शिलाजित आणि विश्वजित नावाचे औषध मिसळतात,

'ते ठीक पण...' वजीर म्हणाला.

'पण-बीण नाही. या चूर्णाने जवानी येते. वजीरसाब, खलीफाच्या नऊ बेगमा जरी तुमच्या समोर आल्या तरी...'

'चूर्ण कार्य पूर्णत्वाला नेईल.' वजीराने वाक्याची खोच पूर्ण केली. आणि दोघेही खो ऽऽ खो ऽऽ हसू लागले. हसता हसता दोघेही थांबले. समोर पाहू लागले. तिन्हीसांजेच्या काळवंडत्या प्रकाशात तो परिसर भेसूर दिसू लागला होता.

इतक्यात अल् अरब नूर अल् सलीम नावाचा तो गृहस्थ आपल्या घोड्यावर स्वार झाला आणि जाता जाता वजीराला म्हणाला, 'मी उद्याच आणतो तुमचे चूर्ण...'

आता वजीर एकटाच मागे उरला.

तिन्हीसांज संपून गेली. सर्वत्र काळोख पसरू लागला. वजीर मात्र घोड्याच्या शेजारी उभा राहून अजूनही विचार करीत होता. आपण केले ते ठीक केले का ? अल् अरब नूर अल् सलाम यास आपण सुलतानाच्या राजमुकुटातील खरा हिरा दिला आणि त्या जागी काचेचा खोटा राजमुकुटात बसवला. उद्या आपण अल् हाझेन सारख्या सालस, निष्पाप वृत्तीच्या वयोवृद्धावर आरोप करणार आहोत. समोरचा बाल पिकलेला अल् हाझेन जरी असला तरी अशा ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध माणसाला आयुष्यातून उठवायचे का ? पण आता वेळ गेली आहे. अल् हाझेनवर आरोप केला नाही तर अरब नूर रुष्ट होणार... बदमाश माणूस रुष्ट झाला की सूड घेणार...

समोरचा घोडा खिंकाळला त्यासरशी वजीर भानावर आला आणि घोड्यावर स्वार होऊन निघून गेला.

मात्र घोडा दौडवता दौडवता वजीराच्या मनात येत होते, अल् हाझेनवर आपण मिथ्या आरोप करीत आहोत. अल् हाझेन हा गावातला, देशातला अत्यंत चाणाक्ष नेत्रविशारद आहे, ज्ञान व्यासंगी आहे. मानवी डोळ्याबद्दलचे त्याचे संशोधन सर्वच पंडितांनी मान्य केले आहे. या उलट अल् अरब नूर... एक सरदार... सतत भानगडी करणारा कावेबाज... दगाबाज...

रात्रभर वजीर विचार करीत, तळमळत राहिला. त्याला चूर्ण तर हवे होते. पण महागड्या चूर्णासाठी त्याला स्वतःच्या राजाशी दगाबाजी करावी लागणार होती. एक होते; खलिफाच्या राजमुकुटात बसवलेला मध्यवर्ती हिरा जरी खोटा, काचेचा असला तरी अल् अरबू म्हणतो त्याप्रमाणे सभोवतीच्या नऊ छोट्या हिऱ्यांच्या प्रकाशाने तो चमचमणार होताच. मध्यवर्ती हिरा खरा की नकली हे तो हिरा बाहेर काढल्याशिवाय कसे काय कळणार ? आणि राजमुकुटातील हिरा बाहेर काढण्याची कुणाची टाप लागलेय ? असे करणे म्हणजे साक्षात देहदंडाची शिक्षा स्वतःच मागून घेणे... या सुखद विचारासरशी बिछान्यावर तळमळणाऱ्या वजीराला गुंगी येऊ लागली. वजीर आरामशीरपणे झोपला. पण अल् हाझेन मात्र अस्वस्थपणे त्यांच्या पाठशाळेत - मदरसामध्ये ऑलिव्ह दिव्याच्या प्रकाशात अनेक पुराणी हस्तलिखिते पहात होते. डोळ्याच्या आकृत्या काढत होते.

मानवी डोळ्यांची आकृती काढून ती पहात त्यांच्या मनात आले, आपण मानव ज्या पृथ्वीवर राहतो ती पृथ्वी सुद्धा एक डोळाच आहे. डोळ्यामध्ये बुबुळ असते आणि या बुबुळासभोवार पांढरे पटल. पृथ्वीभोवती वातावरणाचा थर आहे, पट्टा आहे. हे आपणच नाही का आपल्या शिष्यांना सांगितले... अनेक वेळा वेध घेऊन आपण हे सिद्ध केले...

दिवटीच्या मिणमिण प्रकाशात त्यांनी समोरच्या बाटलीची एक काच उचलली आणि ते

मनसोक्त, समाधानी हसले. ही काच यास्मिनचे डोळे सुधारू शकेल... पोरीला नवी दृष्टी येईल. अल्ला करो आणि तिचे डोळे सतेज, तेजवान होवोत... असे म्हणून त्यांनी प्रार्थना उरकली आणि ते झोपून गेले.

अल् हाझेन आणि वजीर दोघेही झोपून गेले. पण अल् अरबी या कपटी, धूर्त सरदाराला झोप येत नव्हती. उद्या अल् हाझेन यांना सर्वोच्च किताब मिळणार या विचाराने तो कासावीस झाला होता. खरे तर हा किताब आपल्या जावयाला मिळायला हवा होता. तोही मास्तरच आहे. सरकारी शाळा चालवतो... या विचारात आणि अंगरख्यात लपविलेला हिरा अनेक वेळा चाचपत तो बिछान्यावर पडून होता. काय केले तर अल् हाझेनचे पाय ओढत येतील, यावर तो विचार करीत होता. विचार करता करता त्याच्या लक्षात आले की, राजधानीतील सर्व पंडित लोक उद्या एकत्र येऊन बसतील. तिथे एखाद्याजवळ अल् हाझेनविषयी विष पेरायचे...

दोन पंडित एकत्र कधीच येत नाहीत. ते एकमेकाला तसे पाण्यातच पाहात असतात. हे एक, आणि दुसरे असे की, विषाची पेरणी झपाट्याने होते. विशेषत: जमीन जितकी अधिक नापीक तितकी पेरणी त्वरित उगवते... दरबारात वजीराने खूण केली की आपण अल् हाझेनवरती हल्ला चढवायचा. आपण सुरुवात केली की काही पंडित मित्र आपल्याला येऊन मिळतील. आपली बाजू बळकट होईल... खलिफालाही विचार करावा लागेल. एकदा का हा धडाका उडाला की हळूच वजीरसाहेबाने हिरा चोरला, चूर्ण आणण्यासाठी दिला असे खलिफाचे कान फुंकले की बस्स. काम झाले... राज्याचा उद्याचा वजीर आपणच, असा विचार करीत तो झोपून गेला.

दुसरा दिवस उजाडला.

तो सणाचा - इद अल् कबीदचा दिवस होता. मरहुम सुलतान खलिफाने आज अल् हाझेन यांना 'सर्वोच्च शास्त्रज्ञ' असा किताब देण्यासाठी दरबार बोलावला होता आणि या दरबाराला सर्व प्रजेला आमंत्रण देण्यात आलेले होते. सर्व थरातले लोक नवे नवे पेहराव चढवून रस्त्याने दरबारात जात होते. राज्यातले एकत्र आलेले मोठेमोठे विचारवंत एकत्रितपणे गप्पा टप्पा मारत जात होते. या सर्व विद्वान लोकांना अल् हाझेन हे एक डोळ्याचे शास्त्रज्ञ आहेत, त्यांना हिंदोस्थानी लोकांची संस्कृत भाषा येते, ग्रीकांची ग्रीक भाषाही ते उत्तम जाणतात हे ठाऊक होते. चालता चालता त्यांच्या गप्पाही अल् हाझेन साहेबावरती सुरू होत्या.

दबत दबत पण हसरा चेहरा करून अल् अरबी या लोकांत मिसळला. प्रथम चार पाच जणांचे थोडे थिल्लर टोळके त्याने हेरले. या लोकांमध्ये मिळून मिसळून चालताना त्याने अल् हाझेनची स्तुती आरंभली. आस्ते आस्ते अल् हाझेन आणि त्याची महेबूबा, त्या दोघांचा

शिष्यांसमोर चालणारा प्रणय याचे रसभरीत वर्णन त्याने सुरू केले.

आचरटपणा ही विद्वत्तेची सावली असते. सावली जिवंत होऊन जर उभी राहू लागली तर माणसाचा मणका दणका खाऊन आदळतो. अशा वेळी मोठा विचारवंतही सावलीहून सपाट होतो.

नेमके तेच झाले आणि अल् अरबूला चार चाहते मिळाले.

पंडित लोकांचा दुसरा एक गट रस्त्यावर आकृत्या काढून चर्चा करीत होता. एक पंडित सांगत होता:

''अल् हाझेन यांनी, 'पृथ्वीभोवती वातावरणाचा पट्टा असतो' असे मत मांडले आहे. सूर्य क्षितिजाखाली गेला की एकदम काळोख पडत नाही. संधिप्रकाश पडतो. कारण पृथ्वीभोवती वातावरणाचा...''

तो पंडित खाली वाकून रस्त्यावर आकृती काढू लागला. तेव्हा दूरवरून अल् अरबू यास त्याचा जावई दरबार रस्त्यावरून घराकडे परतताना दिसला. अल् अरबू लगबग त्याच्याकडे गेला. जावयाला, 'घरी का चालला ?' विचारू लागला.

त्याचा जावई हा एक नेक, सिधा साधा माणूस होता. अल् हाझेनसाहेब त्यांच्या शिष्यगणांसह दरबारी दाखल झालेत म्हणून मीही माझ्या शिष्यांना घेऊन येतो, असे सांगून जावई पुढे जाणार तोच त्याच्या हातातले कागद पाहून अल् अरबू म्हणाला, 'हे काय आहे!'

'अल हाझेनसाहेब म्हणतात की पृथ्वीभोवती वातावरणाचे दाट आवरण आहे. त्यांच्या या सिद्धांताला मीही मानतो. तोच हा सिद्धांत मी उतरवून काढला आहे. त्यांच्या शिष्याने दिला...'

'काय खूळ घेतलंय डोक्यात तुम्ही लोकांनी ? अहो, पृथ्वीभोवती असे वातावरण असते तर इंद्रधनुष्य दिसले असते का ? कधी कधी दोन इंद्रधनुष्ये दिसतात... तीन चार कधी पाचसुद्धा दिसतील,' अरबू जावयाला म्हणाला.

'तीन ?' जावयाने आश्चर्य व्यक्त केले.

'का नाही ? अहो जमिनीवरून दोन, टेकडीवरून तीन, पर्वतावरून... अल्लामियाने केलेली ही करणी आहे. अस्मान त्याचे आहे, हाझेनचे नाही. बरे, तुम्ही असे करा. घरी जाता आहात तर जा.' त्याच्या कानाशी लागत अल् अरबू म्हणाला, 'अहो तुमच्या त्या अल् हाझेनने हे पृथ्वीच्या वातावरणाचे लफडे मुद्दामच निर्माण केलेय. का की लोकांचे लक्ष त्यामुळे त्याच्या मेहबूबा प्रकरणावरून उडेल.'

'अल् हाझेनसाहेब तसे नाहीत!' जावई रागाने लाल होत म्हणाला आणि चालू लागला.

अल् अरबूने आपल्या जावयाकडे रागाने एकटक पाहिले आणि तो पाय आपटत दरबाराकडे निघाला. आता त्याला थांबून राहता येणार नव्हते. या बावळट माणसामध्ये थोडीसुद्धा चतुराई नाही.

दरबाराची जागा गर्दीने खच्च भरलेली होती. इमाम-हकीम-फकीर-अमीर-उमराव-सरदार-गरीब-बागवान-कंगाल, लमाणाचे व्यापारी, शेकडो लोक आज दरबारात गर्दी करून आलेले होते. बगदाद शहरातील उंच टेकडीवरती सुलतानाचा राजवाडा होता. या राजवाड्याच्या एका भागावर दरबाराची जागा होती. या दरबारात जाताना संगमरवराचे अनेक नक्षीदार खांब होते, मोठमोठ्या बागा, बागेत पाण्याचे झोत उडवणारे कारंजे, ऐश्वर्याचा थाटमाट उडालेला दिसत होता. एका सिंहासनावर खलिफा बसलेले होते. त्यांच्या मागे चार सुंदर तरुण दासी उभ्या राहिलेल्या दिसत होत्या. एका दासीच्या हातात मोरपिसांचा पंखा, दुसरीच्या हातात सुगंधी वाळ्याचा. उरलेल्या दोन दासी फळाफुलांची तबके घेऊन उभ्या होत्या.

अल् अरबू उमरावांच्या रांगेकडे गेला. पंडित लोकांच्या गटात बसणे त्याला कमीपणाचे वाटत होते. त्याची नजर वजिराकडे गेली आणि दोघांनी एकमेकाला खाणाखूण केली.

अल् हाझेन बसले होते त्या विभागाकडे अल् अरबूची नजर गेली, सफेद बालांचा हा मास्तरडा आपल्या सर्व शिष्यांसह आलेला होता. त्याचाच सत्कार खलिफा करणार होता ना! तो न येऊन कसे चालेल! अरबूने मिशांवरून हात फिरवला आणि मनात म्हणाला, 'थेरड्या, आज पाहतो तुला. फार पुढे पुढे जातोयस काय ?पण गाठ आहे या अरबूशी. पंडित विचारवंतांशी नाही.'

दरबारी लोकांवरून फिरणारी अरबूची नजर खलिफाच्या नऊ बेगमांवर गेली. सर्व बेगमा एका ओळीत, दूर बसलेल्या होत्या आणि खलिफा राज-सिंहासनावर आरामात बसलेले दिसत होते. त्यांच्या राजमुकुटातील छोटे हिरे चमकत होते. मात्र मध्यवर्ती मोठा हिरा चमकत नव्हता. ते पाहून अल् अरबू मनात खुदकन हसला. हा हिरा कसा चमकणार ? चमकणारा हिरा तर माझ्याजवळ आहे. असा विचार त्याच्या मनात येताच तो एकदम चाचपून डगल्यात हात घालून पाहू लागला आणि हवे ते हाताला लागताच दरबाराची पुढील हालचाल पाहू लागला.

गोंधळ गलका वाढत जात होता. गर्दी उसळत होती. दरबाराबाहेर बांधलेली अनेक घोडी खिंकाळत होती. उंट रेकत होते .आवाज उमटत होते. गदारोळ वाढत वाढत जात होता. अल् अरबूने मधेच हळूच डगल्यामधून एक आक्रोडाएवढे पुडके काढले आणि खाली वाकून त्या आक्रोडी पुड्यावरचे टरफल दूर करून आत हिरा आहे याची खात्री करून घेतली. हा

हिरा आता तो खलिफाला दाखवून वजीराला चीत करणार होता. पण ती वेळ अजून आलेली नव्हती. प्रथम वजीर त्याला बोलायची संधी देणार. मग तो अल् हाझेनविरुद्ध कैफियत मांडणार. मग टाळ्यांच्या कडकडाटात....

...टाळ्यांचा जोरदार कडकडाट झाला.

वजीर साहेबाने खणखणीत आवाजात अल् हाझेन यांच्या नावाचा पुकारा केला. आजवरच्या त्यांच्याँ ज्ञानोपासनेचे कौतुक केले आणि या त्यांच्या कार्याबद्दल खलिफा सुलतान साहेब खूष होऊन त्यांचा मोठा सन्मान करीत आहेत, एक मोठाच किताब त्यांना देत आहेत असे सांगून वजीर एकदम थांबले.

सर्व दरबार श्वास रोखून गप्प बसला. तसे ते म्हणाले, 'परंतु हा किताब देण्यापूर्वी आपले पूर्वज खलिफा हरूण अल् रशीद यांच्या पद्धतीनुसार अल् हाझेन यांना कोणी शत्रू तर नाहीत ना, याची खात्री सुलतान साहेबांना करायची आहे. ज्या कोणाला अल् हाझेन यांच्या कार्याविषयी शंका असेल...'

'महाराज', अल् अरबू मधेच घाईघाईने उठून उभा राहून म्हणाला, 'अल् हाझेन श्रेष्ठ शिक्षक आहेत. ते शास्त्रज्ञही असावेत. परंतु इन्शाल्ला, ते माणूस म्हणून कसे आहेत ? हे महत्त्वाचे आहे.अनेक नेत्ररोगी त्यांनी बरे केले असतील. अनेक शास्त्रीय शोध त्यांनी लावले असतीलही. परंतु हेही एक सत्य आहे की, बाल पिकलेल्या या गृहस्थाची एक पंधरा वर्षाची महेबूबा आहे आणि तिच्या बरोबर हे गृहस्थ स्वतःच्या शागीर्दांसमोर रंगढंग करीत असतात. अल्ला शपथ मी हे सांगत आहे.'

सर्वत्र साशंक शांतता पसरली.

अल् अरबू, अल् हाझेन यांच्या शिष्यांकडे पहात म्हणाला, 'खलिफासाहेबांनी हवे तर या पोरा-टोरांना विचारून खात्री करून घ्यावी. रोज संध्याकाळी, सूर्यास्त झाल्यावर अल् हाझेन यांच्याकडे एक १५-१६ वर्षाची छोकरी येते की नाही ?'

मुले मान खाली घालून बसली.

अल अरबूला चेव चढला. तो आवाज चढवून म्हणाला, 'आता महाराजांनी वजीरसाहेबांना विचारावे आणि खातरजमा करून घ्यावी.'

मान खाली घालून वजीर उभा राहिला.

'हेऽ खरे आहे ?' खलिफांनी आपल्या सौम्य पण जरबयुक्त आवाजात अल हाझेन यांना विचारले.

अल् हाझेन मान खाली घालून 'हो' म्हणाले.

'या मुलीचे आणि तुमचे नाते काय आहे ?' वजिराने विचारले आणि उत्तरासाठी न थांबता वजीर म्हणाला, 'खलिफासाहेब जो किताब देणार आहेत तो 'श्रेष्ठ मानव' असा किताब आहे. तेव्हा या माणसाचे चारित्र्य संशयातीत असा...'

'सबूर' हात करून खलिफा म्हणाले, 'हरूण अल् रशीद यांच्या अव्वल परंपरेला स्मरून आम्ही इतकेच म्हणतो की, हाझेन यांनी आपली बाजू मांडावी. आम्ही त्यांची बाजू ऐकण्यास उत्सुक आहो.'

... इतक्यात जवळच्या मशिदीतून बांग आली. खलिफांनी हात वर केले व ते म्हणाले, 'दुपारी आम्ही अल् हाझेन यांची बाजू ऐकू. त्यांनी या मुलीला दरबारात घेऊन यावे.'

'ती इफ्रिता नसेल तर-' अरबू म्हणाला.

'आणि असेल तर ?' खलिफा एकदम म्हणाले. 'काय आहे, काय नाही पाहणे हे आमचे काम आहे. आमच्या दरबारातील होयबा लोकांनी दरबारी शिरस्ता नीट पाळावा. आम्हाला सत्य हवे आहे. व्यक्तीवर उडवलेली धूळफेक नको.' असे म्हणून खलिफा दरबार सोडून प्रार्थनेसाठी वळला.

अल अरबूने पुढे जाऊन कुर्निसात केला आणि 'इन्शाला! बंदा माफी चाहता है' म्हटले.

खलिफा त्याच्याकडे न बघता झटकन पुढे गेले.

कलाक दीड कलाका नंतर दरबार भरला तेव्हा सर्वच जण आत येणाऱ्या अल हाझेन यांच्याकडे पहात राहिले. पंधरा-सोळा वर्षाच्या तरुणीचा हात धरून ते शांतपण येत होते. या मुलीचा हात त्यांनी ममतेने हातात शांतपणे घेतलेला होता आणि ते तिला धरून धरून आणत होते. ही मुलगी विलक्षण सुंदर दिसत होती. चेहरा गोल, अंगकांती गुलाबी, पाठीमागे काळेभोर केस. केसांचा मोरपिसारा वाऱ्यावर उडत होता. बोटे नाजूक आणि लांबसडक. या बोटांच्या नखांवर गुलाबी पाकळ्या डकवल्यामुळे गुलाबाच्या पाकळ्यांवर पडलेल्या दवबिंदूप्रमाणे तिचे हात दिसत होते.

खलिफा टक लावून त्या मुलीकडे पहात, 'या अल्ला, सुभानअल्ला', म्हणाले. त्यांची तर नजरबंदी झाली होती. त्यांचीच काय पण खलिफा साहेबांच्या नऊ बेगमाही अक्षरश: त्या मुलीकडे घायाळ होऊन पहात होत्या.कुणी असूयेने, कुणी द्वेषाने...

दरबार सुरू झाला.

महाराजांना कुर्निसात करून अल् हाझेन म्हणाले, 'महाराज, ही माझ्या शेजाऱ्याची मुलगी. ही झाली आणि तिचे आई-वडील तिच्या बाळपणीच पैगंबरवासी झाले. म्हणून हिला मीच माझ्या अंगाखांद्यावर वाढवले. पुढे मला असे जाणवले की, तिच्या डोळ्यात दोष आहे.

म्हणून तिची दृष्टी क्षीण झालेय. केवळ तिच्या ममतेने मी स्वत:ला डोळ्यांच्या शास्त्राकडे वाहून घेतले. अनेक हिंदू ग्रंथ-चरक, सुश्रुत वगैरे बडे मियांच्या ग्रंथांचा अभ्यास केला. ग्रीक लोकांचे ग्रंथ वाचून काढले.चिनी व्यापाऱ्यांकडून त्यांचे दवे आणले... दुवे आणले... पण केवळ शास्त्रविषयक ज्ञानावर माझ्या यास्मिनची श्रद्धा असल्यामुळे ती रोज संध्याकाळी माझ्या मदरसामध्ये येत असे. पुस्तकांवर एक गुलाबाचे फूल वहात असे. तिचे बोट धरून मी रोज तिला नेत असे. अजूनही बोट धरूनच मला न्यावे लागते...' खलिफा एकटक अजूनही त्या सुंदर चेहऱ्याकडे पहात होते.

...इतक्यात तावातावाने अरबू उठला. पण तो उठणार तोच अल हाझेन म्हणाले, 'महाराज, मी हिला माझी मुलगी मानले आहे. मी तिचा पिता आहे.'

अल हाझेन बोलायचे थांबले तसा अल अरबू म्हणाला, 'समजा ही मुलगी अल हाझेन स्वत:ची समजतात तर मुलीचे लग्न ते स्वतः आपल्या महाराजांबरोबर करून देण्यास तयार आहेत काय ?'

'आम्ही या सुंदर चेहऱ्याच्या मुलीवर लुब्ध झालो आहोत. आमच्या राजमुकुटात नऊ लहान हिरे आहेत आणि एक मध्यवर्ती मोठा हिरा आहे. आम्हाला नऊ बेगमा आहेत. पण मध्यवर्ती हिऱ्यासारखी बेगम आम्हाला हवी आहे.'

'महाराज, तोबा तोबा.' वजीर कानात म्हणाला. 'जी मुलगी तुमचे रूप पाहू शकत नाही, ती मुलगी केवळ तुमच्या ऐश्वर्यावर भाळली असे नाही का होणार ? यात कसला मर्दपणा-' झटकन त्याने जीभ चावली व तो गप्प झाला. बोलण्याचे त्याने टाळले.

तेवढ्यात अल् हाझेन पुढे झाले. त्यांच्या हातात एक काच होती. ही काच त्यांनी यास्मिनच्या डोळ्यासमोर धरली आणि ते महाराजांना म्हणाले, 'आता तुम्ही हिच्या डोळ्यांची परीक्षा घ्या. हिची दृष्टी मंद होती ती आता तीक्ष्ण झालेली आहे का पहा!'

कुतूहलाने खलिफा पुढे झाले, त्यांनी यास्मिनच्या चेहऱ्यावरून तिचे नीट निरीक्षण केले आणि ते समाधानाने हसत सिंहासनावर बसत म्हणाले, 'बोल पोरी, माझ्या डाव्या बाजूला ज्या दोन दासी उभ्या आहेत त्यांच्या हातात काय आहे ?'

'एका दासीच्या हातात मोरपिसांचा पंखा आहे. तर दुसरीच्या हातात सुगंधी वाळ्याचा.'

'आणि दुसऱ्या दोन दासी उजव्या बाजूला आहेत, त्यांच्या हातात ?'

'या दोन दासींच्या हातात फळांची आणि फुलांची ताटे आहेत!'

'वा! बहोत खूब!' खलिफा आनंदून म्हणाले, 'आता सांग पोरी, माझ्या पाठीमागे जी दासी उभी आहे तिच्या हातात काय आहे ?'

'महाराज, क्षमा असावी. ही दासी नसून तो एक पुरुष शरीररक्षक आहे आणि त्याच्या हातात लखलख़ता खंजीर आहे...' यास्मिन म्हणाली.

'वा! वा!! अल् हाझेन, तुमच्या काचेच्या औषधामुळे या पोरीला स्पष्ट दिसू लागले आहे.' नंतर ते पुन्हा यास्मिनकडे पाहून म्हणाले, 'पोरी, माझ्या मुकुटामध्ये किती हिरे आहेत, त्याचे उत्तर दे पाहू!'

'महाराज, आपल्या राजमुगुटात नऊ हिरे आहेत.'

'नऊ ?'

'हो नऊ' यास्मिनने उत्तर दिले.

'की दहा ?' नीट पाहून सांग.

'नऊ' यास्मिन पुन्हा म्हणाली. थोडा वेळ बिचकून ती थांबली आणि आपल्या पितृतुल्य अल् हाझेनकडे पहात म्हणाली, 'नऊ खरे हिरे आणि एक मधला खोटा हिरा!'

'खोटा हिरा ?' खलिफा चमकून म्हणाले.

'हो, तो हिरा खरा असता तर त्याच्या प्रकाशाने इतर हिरे गगनस्थ नऊ ग्रहांप्रमाणे सूर्यासमोर निष्प्रभ झाले असते. पण आता तो हिरा केवळ नऊ छोट्या हिऱ्यांच्या तेजाने लकाकतोय.'

यास्मिनचे हे बोलणे ऐकताक्षणीच वजीर चपापला. अल् अरबू चुळबुळ करू लागला आणि खलिफा महाराजांनी मुकुट काढून आपले डोळे त्या मध्यवर्ती हिऱ्याकडे वळविले तोच यास्मिन म्हणाली, 'महाराज, अल्ला शपथ मी सांगते अल्ला धन्य आहे. तो दयाळू आहे. विश्वाचा निर्माता, ज्याने स्तंभाच्या आधाराशिवाय अस्मान तोलून धरले त्या अल्लाच्या नावाने मी सांगते की, खरा हिरा अस्मानातून जरी खाली पडला तरी फुटणार नाही. पण हा काचेचा हिरा...'

यास्मिन असे काही सांगतेय तोच रागारागाने खलिफा महाराजांनी खंजीर खूपसून राजमुगुटातल्या हिरा उचकला. तो टपकन् खाली पडला आणि त्याचे शतशः टवके उडाले.

ते पाहूनच खलिफा म्हणाले, 'या खुदा, तोबा, तोबा! हा तर दगाफटका आहे.' महाराजांचे बोल ऐकून वजीराने स्वतःला सावरले आणि त्यांच्या जवळ जाऊन म्हणाला, 'महाराज, हिऱ्याच्या व्यापाऱ्याला या अरबू उमरावाने आणले. खात्रीने तो हिरा त्याच्याजवळ असेल.'

वजीर असे म्हणतोय तोच दोन रक्षकांनी तात्काळ अरबू उमरावाला गिरफ्दार केले. त्याची झडती घेतली आणि छोटे गाठोडे बाहेर काढले. या गाठोड्यात एक आक्रोड होते. ते आक्रोड सहज दाबून फुटले आणि दोन वाट्यांमध्ये ठेवलेला हिरा बाहेर पडला. हिरा महाराजांकडे

देता देता आक्रोडाची दोन टरफले रक्षकांनी फेकून दिली. ती दोन टरफले अल् हाझेन यांच्या पायाशी पडली. अल् हाझेन दचकले.

पायाशी पडलेली टरफले त्यांनी उचलून घेतली आणि एकदम खूष झाले. हवे ते त्यांना क्षणीच गवसले असावे.

खलिफा उभे राहून म्हणाले, 'अल् हाझेन यांनी एका काचेला गोलाई देऊन आज केवढा मोठा चमत्कार घडवून आणला आहे हे आपण पाहिलेच आहे. या त्यांच्या शास्त्रीय शोधाबद्दल तमाम मानवजात त्यांची ऋणी राहील.'

खलिफा श्वास घेऊन पुढे म्हणाले, 'मानव जातीला दिलेल्या या वरदानामुळे आम्ही अल् हाझेन यांचा सन्मान करून त्यांना राज्याचा सर्वश्रेष्ठ किताब देणार आहोत...'

तेवढ्यात अल् हाझेन उठले आणि दरबाराकडे तोंड करीत म्हणाले, 'महाराज थांबा, थांबा. काचेच्या मदतीने मानवाला दृष्टी देणे काही माझा शोध नाही. ती पद्धती मी चिनी लोकांपासून शिकलो. मला फक्त माझ्याच शोधाचे श्रेय द्या. हा पहा माझा शोध...' म्हणून त्यांनी वाळलेले आक्रोड हात उंच करून दाखविले.

'काय, वाळलेले आक्रोड हे सुद्धा संशोधन आहे ?' खलिफा आश्चर्याने अल् हाझेनना म्हणाले.

अल् हाझेन यांनी आक्रोडाचे दोन भाग सर्व दरबाराला दाखवले. मग ते म्हणाले, 'जसे या आक्रोडाचे दाट टरफल आहे तसेच टरफल या पृथ्वीभोवती आहे. या दाट वातावरणाचे टरफल फाटले तर अस्मानातून सूर्याच्या उन्हाहून अधिक तीव्र असे भयंकर उष्ण किरण पृथ्वीवर येतील आणि या किरणांनी खोटे हिरेच काय पण खरे हिरेही शतशः ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन जळून जातील!'

'महाराज, या संशोधनासाठी आम्हाला सरकारी मदत मिळावी. अनेक शिष्य, अनेक अरबी मुले शास्त्रशाखेकडे यावी म्हणून मी आपणाकडे याचना करीत आहे.'

'ठीक आहे. सरकारी खजिन्यातून आम्ही तुमच्या मदरसेला मदत करू.' खलिफा म्हणाले.

वजीर पुढे झाला.

आता त्याच्या चेहऱ्यावर तरतरी आली होती. अल् अरबूची गठडी वळवली होती, हिरा हाती येऊन आपण केलेली चोरीही दडली गेली होती आणि वजीरस्थानही आता कायम राहणार होते.

घाईघाईने तो खलिफाना म्हणाला, 'अल् हाझेन यांच्या मदरसेला मी उद्याच महाराजांच्या

तिजोरीतून एक अरब दिनार मदत देतो. राज्यातील सर्व मदरसांना अल् हाझेन साहेबांमार्फत मदत होईल अशी व्यवस्था करतो. म्हणजे सर्व शाळांच्या संशोधनावर त्यांची सक्त नजर राहील.'

'वा, वा! बहोत खूब!' खलिफा म्हणाले.

त्यांच्या या उद्‌गाराने वजिराचा चेहरा इस्तंबुली डाळिंबासारखा टवटवीत फुलून आला. ढासळणारे आपले स्थान आपण कसोशीने सावरले या कैफात तो असतानाच खलिफा म्हणाले, 'आणि उद्याच आमची शादीही यास्मिनबरोबर निश्चित करा. या हरुण अल् रशिदच्या वंशजाला अशा कामासाठी चूर्णाबिर्णाची आवश्यकता लागत नसते.' असे म्हणून ते दरबार सोडून निघून गेले.

मग मात्र वजिराचा चेहरा एखाद्या नासक्या आक्रोडासारखा काळसर खडबडीत पडला.

❖ ❖ ❖



वैद्यांचे वैद्य - ॲव्हिसिन्ना

अबु अली अल् हुसेन इब्नसीना उर्फ ॲव्हिसिन्ना (इ.स. ९८०-इ.स.१०३७) हे एक अरबी महावैद्य होऊन गेले. त्यांचे दोन ग्रंथ प्रख्यात आहेत -

१. अरबी अलन शीफा आणि २. कॅनन-फी-ल-तीब.

पहिल्या ग्रंथाचे १८ भाग असून त्यात शास्त्र-भूगोल-तत्त्वज्ञान वगैरे सर्वच विषयांवरील त्याकाळी ज्ञात असलेले ज्ञान त्यांनी एकत्र केलेले आहे. त्यांचा दुसरा ग्रंथ वैद्यकशास्त्रावर आहे. वैद्यकीय संहिता असलेला हा ग्रंथ त्याकाळी फारच प्रसिद्ध पावला होता आणि युरोपमधील अनेक भाषांत त्याची भाषांतरे झाली होती. या 'कॅनन ऑफ मेडिसीन' या ग्रंथाच्या, पंधराव्या शतकात १५ आवृत्ती निघाल्या. १६ व्या शतकात २० आवृत्ती निघाल्या. १७ व्या शतकाच्या अखेरपर्यंत हाच ग्रंथ वैद्यकीय ज्ञानाची युरोपची गंगोत्री मानली जात असे.

आज आपल्याला 'कॅन्सर' किंवा 'एडस्' या रोगांची जितकी धास्ती वाटते तितकीच त्याकाळी कफाचा क्षय या रोगाची वाटत असे. या रोगावर रामबाण औषध नसल्यामुळे रोगी अर्धमेला होत असे. सूक्ष्मदर्शक यंत्र आणि क्ष-किरण फोटो त्याकाळी मानवाला माहीत नव्हते. तरीही अशा त्या अप्रगत काळी ॲव्हिसिन्ना रोग्याचे मनोधैर्य वाढवून आहार, देहाची स्वच्छता व थोडाफार व्यायाम वगैरे सांगून मरीजामध्ये म्हणजे क्षय-रोग्याच्या मनात जगण्याची उर्मी निर्माण करीत. त्याच्या संसर्गापासून इतरांना वाचवत.

जीवनाचे खरेखुरे चढउतार ॲव्हिसिन्ना यांच्या वाट्याला आले. तीन चार अरब अमीरांना त्यांनी रोगमुक्त केले. सुलतान गझनी महमद याने तर त्यांच्या शिरावर मोठे बक्षीस लावले होते. अनेकदा तुरुंगवास, वाळवंटात पलायन, गोरगरिबांच्या वस्तीत आयुष्य, बिमारीस्थानात (म्हणजे आजचे हॉस्पिटल) न रहाणे असे आयुष्य काढत ते ५७ वर्षे जगले. गॅलननंतर युरोपचा सगळा भार ॲव्हिसिन्ना आणि अरबी वैद्य राझेझ या दोघांवर होता.

पॅरिस विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मेडिसीन या संस्थेत दोन मुस्लिम वैद्यांची व्यक्तीचित्रे लावलेली आहेत. त्यातील एक राझेझ या अरबी वैद्यांचे असून दुसरे 'राजवैद्य - वैद्यांचे वैद्य' ॲव्हिसिन्ना यांचे आहे.

■

यक्ष अडकला खळ्यात अक्षय...

इस्पहान शहराबाहेरच्या रस्त्यावर ते बिमारीस्थान उभे होते. बिमारीस्थानाची इमारत चांगलीच मोठी आणि भक्कम, दगडी दिसत होती. इमारतीबाहेर सुंदर बगीचा होता. उंचच उंच मोठी झाडे, या झाडांभोवती शोभिवंत फुलांची झाडे, वेली-कमानी, ठिकठिकाणी पाण्याची कारंजी, कारंज्यातून पान्यासारख्या पाण्याच्या धारा चौफेर उडत होत्या. एक थंड आतषबाजीने बाग बहरलेली होती. रंगीबेरंगी झाली होती.

पण बागेत आणि बिमारीस्थानाच्या पुढच्या पटांगणात जमलेल्या माणसांची तोंडे पहाण्यासारखी होती. चेहरे दुःखी, पडलेले, खप्पड असे. कुणी आपल्या बिमार मरीजाबरोबर सांत्वनपर बोलत होते, तर कुणी मरीजाला खांद्यावर घेऊन आत केव्हा जायला मिळते याची वाट पाहात होते. काहीजण घोडागाडी करून येत होते. काही उंटांच्या गाड्या करून... पण सर्वांची तोंडे पडलेली. कारण बहुतेक रुग्णांच्या तोंडचे पाणी 'मौत क़ी खासी' म्हणजे क्षय-कफाचा क्षय या विकाराने पळालेले. मौत की खासी एकदा का झाली की परमेश्वर - अल्लाशिवाय तरणोपाय नव्हता. नाही म्हणायला प्रत्येकाला एकच आशा वाटत होती. बिमारीस्थानात नव्याने रुजू झालेल्या 'ॲव्हिसिन्ना' या तरुण हकीमाने एकदा का तपासून सांगितले की 'मौत की खासी झालेली नाही' की झाले. मग जन्मभर खोकला अंगात राहिला तरी भीती नाही. फार तर घसा खोकून कोरडा पडेल, छाती दुखेल, तापाने जिभेची - अन्नाची चव जाईल, थोडा काळ... पण जान जाणार नाही.

बिमारीस्थानात 'मौत की खासी' रोगाबद्दल नाव कमावलेले ॲव्हिसिन्ना एकाग्रपणे एकेका रुग्णाला तपासत होते. रुग्णाचा खोकला- ढास ऐकत होते. त्याचे डोळे- हात-पाय-पोट चाचपत होते. रुग्णाला आपल्या सहाय्यकाजवळ पाठवून देत होते. सहाय्यक त्यांना हवी असणारी रुग्णाची इतर माहिती जमा करून घेत. घरातल्या कुणा कुणाला 'मौत की खासी' झालेय ? वगैरे. हकीम घरी परत जाताना सर्व तपशील गोळा करीत. त्यावर विचार करीत रहात. आता आता त्यांची खात्री झाली होती की, 'मौत की खासी' हा रोग संसर्गजन्य आहे, थोडा अनुवंशिकही.. पण संसर्गजन्य अधिक, म्हणजे रोग्याच्या खोकल्याच्या फवाऱ्याने तो पसरतोय.

बाहेरच्या बगिच्यात सकाळचे सूर्याचे किरण पडू लागल्यावर त्यांनी एकदम काम थांबवले

आणि ते सहाय्यकाला सांगून बाहेर पडले. आज त्यांना इस्पहानच्या अमीर साहेबांकडे जायचे होते. त्यांना घेऊन जायला अमीर साहेब माणूस पाठवणार होते. माणूस यायला अवकाश होता. तरीही ते बाहेर आले आणि दूर आपल्या आवडत्या जर्दाळूच्या झाडाखाली येऊन थांबले. डोके 'मौत की खासी'ने भणभणत होते. मौत की खासी झालेल्या मरीजाला ते मृत्यूपासून वाचवू तर शकत नव्हते; फक्त शाब्दिक दिलासा देऊन त्याचे आयुष्य वाढवता आले तर वाढवत होते... म्हणजे ते प्रयत्न करीत.

इतक्यात त्यांच्या कानावर हाक ऐकू आली: 'इब्सीन, इब्सीन'

आपल्या घरगुती नावाने कोण हाका मारतोय हे त्यांना समजेना. इकडे तिकडे पाहता पाहता त्यांना त्यांच्या रोखाने येणाऱ्या माणसाची ओळख पटली. अगदी बालपणीचा त्यांचा तो मित्र-वालीदशा नावाचा. लहानपणीचे मित्र माणसाला अधिक तीव्रतेने आठवतात तसा हा वालीदशाही त्यांना तात्काळ आठवला.

तोपर्यंत वालीदशा त्यांच्या जवळ आला. त्याने ॲव्हिसिन्नाना कडकडून मिठी मारली आणि म्हटले, 'इकडे कुठे ?'

'हाच प्रश्न मी तुला विचारतो.' ते हसत हसत म्हणाले.

'भले वा! ठीक आहे. मी इथे या बिमारीस्थानात एका व्यक्तीला भेटायला आलोय.' वालीदशा म्हणाला.

'का ? कोण आजारी आहे ?' ॲव्हिसिन्ना एकदम म्हणाले. त्यांच्या रक्तातला हकीम जागा झाला.

'बायकोला खोकला झालाय.'

'मग बायको कुठे आहे ?' ॲव्हिसिन्ना इकडे तिकडे पहात म्हणाले.

'ती येतेय मागून. तिच्या भावाबरोबर.'

'ठीक आहे. खोकलाच झालाय ना! जाईल चार दिवसात! त्यात काय आहे ? हवा जरा बदलली की होतो तो!'

'तसा नाही तो खोकला. सहा महिने झाले जात नाही. मला तर भीती वाटतेय. मौत की खासीऽऽ' मित्र थरथरत म्हणाला.

'छ्या' ॲव्हिसिन्ना एकदम म्हणाले, 'मौत की खासी! काय वेडबीड लागलेय! जो उठतो तो मौत की खासी...' ते बोलताना थांबले.

'अरे मित्रा, सध्या माझी नहस-दुर्दैवी ग्रहदशा चालू आहे. गावच्या हकीमाने सांगितले की, शहरातल्या बिमारीस्थानात ॲव्हिसिन्ना नावाचा हकीम आहे त्याला दाखवा.'

आपलेच नाव आपल्या मित्राच्या तोंडून ऐकून ॲव्हिसिन्ना इतके भारावले की, क्षणभर ते मित्राकडे डोळे राखून पहातच राहिले. हळूच त्यांनी आपल्याच हाताला चिमटा घेतला आणि मग ते मित्राच्या खांद्यावर हात टाकून म्हणाले, 'मित्रा, तो ॲव्हिसिन्ना हकीम मीच आहे. ही माझी डोक्यावरची तांबडी टोपी पहा. मी फक्त माझे नाव बदलले.'

'तू... इब्सीन... अरे एवढा मोठा हकीम झालास ? या अल्ला परवर दिगार...' असे म्हणून वालीदशा क्षणभर डोळे मिटून शांत बसला. त्याने मनातल्या मनात प्रार्थना म्हटली, 'करुणाकर, करुणानिधी अल्लाच्या नावे, अल्ला धन्य होय. तो दयाळू सम्राट. विश्वाचा निर्माता. त्रिभुवनांचा स्वामी. त्याने स्तंभांच्या आधारावाचून...'

प्रार्थना झाल्यावर त्याने डोळे उघडले. तेवढ्यात त्याचे लक्ष बाहेर एका उंटाच्या गाडीकडे गेले. या गाडीतून एक अरब उतरला होता. वालीदशा ॲव्हिसिन्नांना म्हणाला, 'मित्रा, तो बघ माझ्या बायकोचा भाऊ बहिणीला घेऊन आला. चल मी तुझी ओळख करून देतो. आता तू तिला तपास आणि सांग माझ्या नशिबात काय लिहिलेय ....'

ॲव्हिसिन्नांनी अश्रूने डबडबलेल्या त्या मित्राला कवटाळले आणि ते म्हणाले, 'मित्रा, अरे असा घाबरू नको. खोकल्याचे अनेक प्रकार असतात.' असे म्हणून ते वालीदशाच्या खांद्यावर हात ठेवून गाडीच्या रोखाने निघत म्हणाले, 'मी तुझ्या मेव्हण्याशी फक्त बोलत राहतो. तुझ्या बायकोच्या खोकण्याच्या आवाजाने मला परीक्षा करता येईल. मात्र तिचे तोंड एकदा मला पहावेच लागेल...'

'....जरूर. ओळख देतो ना करून' असे म्हणून वालीदशा थांबलेल्या उंटाच्या गाडीजवळ आला आणि बायकोला म्हणाला, 'जरा बघ तर खरे बुरखा काढून. हा माझा बालपणीचा मित्र- इब्सीन भाईजान'

बुरखा वर उचललेल्या तरुणीकडे ॲव्हिसिन्ना पहातच राहिले. सतेज, हसरा चेहरा. तरतरीत डोळे.... इतक्यात तिला ढास लागली खोकल्याची.....

ॲव्हिसिन्नांनी झटकन् बटव्यामधून ज्येष्ठीमधाची एक मुळी काढली आणि तिला देऊन म्हटले, 'ही तोंडात धरा ढास संपेपर्यंत...' मेव्हण्याशी चार गप्पा मारून ते वालीदशाला म्हणाले, 'मित्रा, जरा तिथे तर चल झाडाखाली.'

गंभीरपणे चालणाऱ्या आपल्या मित्राला वालीदशा म्हणाला, 'इब्सीन, खरेखुरे सांग.'

'अरे खरेच सांगतो, तुझ्या बायकोला दमा-अस्थमा आहे. मौत की खाँसी वगैरे काही नाही. अस्थमा असला की लंबी उमर मिलती है, तू बेफिकीर रहा.... खोकल्याचा आवाजच सांगतो. क्षय आणि दमा दोघे जुळी भावंडे असतात. क्षयात वजन घटते, दम्यात...'

'जुळी!' चमकून वालीदशा म्हणाला.

'हां जुळी. दोन्ही प्रकारात जन्मभर खोकला राहतो पण... दम्याचा खोकला मरीजाला ठार मारत नाही. फक्त हैराण करतो...' असे म्हणून ते मित्राच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, 'अरे, इतक्या तरतरीत, सुंदर चेहऱ्याच्या मुलीला कोण म्हणेल की खांसी झालीय.... अच्छा, मी जातो.तिथे झाडाखाली उभा राहतो...'

'झाडाखाली ? कशासाठी ?' वालीदशाने आश्चर्याने विचारले.

'इस्पहानच्या अमीराला मला आता तपासण्यासाठी जायचे आहे. त्याला बहुतेक मौत की खाँसी झाली आहे. त्याची माणसे या झाडाजवळ मला न्यायला येणार आहेत.'

'बाप रे,' वालीदशा एकदम काहीतरी आठवून म्हणाला, 'इब्सीन, एक इशारा देतो, या अमिराला दोन मुले आहेत. राज्याच्या गादीबद्दल दोघांमध्ये भांडण आहे. धाकट्याची सोयरीक आहे ती दमादान घराण्याशी...' असे म्हणून वालीदशा थांबला. त्याने तिरका कटाक्ष टाकून ॲव्हिसिन्नाकडे पाहिले.

'अरे, ओ तो घरेलू मामला आहे! मला हकीम म्हणून त्याच्याशी काय करायचे आहे ? त्यांचे ते पाहून घेतील. माझे काम अमीरसाहेबांना तपासणे, दवापाणी करणे एवढेच!'

'एवढेच!' वालीदशा म्हणाला, 'अरे इब्सीन, गझनीच्या सुलतानाने तुला कसेही पकडण्यासाठी सोन्याचे १०,००० दिनार इनाम लावलेत ते विसरलास....'

ॲव्हिसिन्ना एकदम थरकापले.

वालीदशा जवळ येऊन म्हणाला, 'तू फिकीर नको करू. काही दगाफटका झाला तर सरळ माझ्या घरी ये. मी इथेच त्या टेकडीपलीकडे नहिसाबाद गावात राहतो. त्या गावात एक तळे आहे. तळ्याजवळ जुनाट दर्गा आहे. त्या दर्ग्याजवळचे घर माझे आहे. तिथे येऊन विचार, वालीद दर्जी कुठे राहतो. कुणीही सांगेल.' असे म्हणून वालीदशा जाऊ लागला. पण जाता जाता मागे वळून जवळ येत म्हणाला, 'पण नक्की मौत की खाँसी नाही ना ?'

'अरे नाही, नाही, नाही! काय वार्ता करतो तू. इतक्या टवटवीत चेहऱ्याच्या बाईला काय मौत की खाँसी असेल ?' ॲव्हिसिन्ना म्हणाले.

'अल्ला तुझे भले करो' वालीदशा म्हणाला. 'काही आफत आली तर माझ्या घरी ये. तुला हातापायात कड्या अडकवून कैद करतो' असे म्हणत तो हसत हसत निघाला.

'आणि १०,००० दिनार मिळवतो.' ॲव्हिसिन्ना त्याला ऐकू जाईल अशा शब्दात हसत हसत म्हणाले आणि गंभीर झाले.

मग मात्र ॲव्हिसिन्ना स्वतःच्या आयुष्याबद्दल विचार करीत राहिले. क्षणभर त्यांच्या

डोळ्यापुढून त्यांच्याच आयुष्याचा चित्रपट पुढे सरकत गेला. बालपण काकाकडे मार खात गेले... पुढे मदरसा-शाळा... दारोदार भटकत कसेतरी दिवस गुजरले... या काळात एका सूफी फकीराकडून दवा-पाण्याचे ज्ञान मिळाले. पुढे काळाने पलटी मारली. बुखाऱ्याच्या अमीराचे पोटाचे दुखणे बंद केले आणि त्याच्या मर्जीवर राजवैभव भोगले. दिवसभर राजवाड्याच्या वाचनालयात किताबे वाचली.... हिंदोस्थामधल्या प्रसिद्ध - श्रेष्ठ हकीमांचे भाषांतरित ग्रंथ चरक... सुश्रुत...वागभट. ग्रीकांचे भाषांतरित ग्रंथ, जुनेपुराणे इजिप्तमधले ग्रंथ... यावेळी आपल्याबरोबर आपले दोन जिवलग मित्र होते... अल् बेरूणी आणि मसीही... पुढे पुन्हा काळाने पलटी मारली... अमीरावर हल्ला झाला... गझनीचा सुलतान... त्याने हुकूमनामा काढला.... आपल्याला कैद करून गझनी किंवा हिंदोस्थाकडे नेणार सांगितले... आपला मित्र अल् -बेरूणी हिंदोस्थांकडे सुलतानाबरोबर गेला... त्याला संस्कृतची आवड होती... आपण या सुलतानी बळजबरीविरुद्ध कैफियत मांडली... पुढे पळ काढला. आपल्या डोक्यावर १०,००० दिनार लावण्यात आले. आपण आपल्या मसीही मित्राबरोबर वाळवंटात धावलो.... दमादानच्या अमीराने पाठलाग केला... कैद... तुरुंग...तुरुंगातून पुन्हा पळ... काळाचे अनेक चढउतार.. ग्रहदशा...

विचाराच्या तंद्रीत असताना झाडाचे पान टपकन त्यांच्यापुढे पडले. तंद्री विस्कटली. ते समोर पाहू लागले... दोन घोडेस्वार एकदा त्यांच्याकडे पहात, एकदा झाडाकडे पहात त्यांच्या आसपास आले. एकाचा पोषाख आणि घोडा पांढरा होता. तर दुसरा घोड्यासकट तपकिरी रंगात सजलेला होता. त्यांचे चेहरे ते राजपुत्र असावेत असे सांगत होते...

'ॲव्हिसित्रा हकीम आपणच का ?' दोघांपैकी एकाने अत्यंत अदबीने विचारले.

ओळखदेख झाली.

ते दोघे मरीज अमीराचे मुलगे होते. मोठा होता तो बराच अदबशीर, नम्र वाटला. त्याचे नाव काबाबक्ष. पण छोटा रगेल असावा. आपले खुदाबक्ष हे नावसुद्धा त्याने आढेवेढे घेत सांगितले. इतकेच नव्हे, तर आपल्या अब्बाजानना म्हणजे अमीरसाहेबांना 'मौत की खॉंसी' झाली आहे असे म्हणून तो म्हणाला, 'काय आठ-दहा दिवस करायचे ते उपाय करा. लेकीन, मौतसे अब्बाजान छुटेंगे नही... तुम तुम्हारा इनाम...'

खुदाबक्षचे हे बोलणे ऐकून हकीम ॲव्हिसित्रा एकदम आश्चर्यचकित झाले आणि थंडपणे म्हणाले, 'हकीम कोण आहे ? मी की तुम्ही ?' मग मात्र तो नाठाळ राजपुत्र थोडा सरळ आला.

राजवाड्याच्या पायऱ्या चढतानाही त्यांना खुदाबक्षाचे शब्द आठवत होते - 'मौत से

अब्बाजान छुटेंगे नही!' खरे म्हणजे 'कौन छुटता है ?' असा सवाल करावा असे त्यांच्या मनात येत होते, पण ते संयम राखून गंभीरपणे दिवाणखान्यात शिरले...

दिवाणखाना अमीराचे ऐश्वर्य दाखवत होता. छताच्या झुंबरावर रत्ने चमकत होती. पायाखाली गालीचा.... दारे आणि खिडक्यांवर चीन देशातून आणलेल्या तलम-झगमगीत कापडाचे पडदे. पण असे ऐश्वर्य ॲव्हिसिन्नांनी तीन-चार निरनिराळ्या अमीरांकडे नोकरी करताना पाहिले होते.

मरीज अमीर ॲव्हिसिन्नांना पाहिल्यावर खोकत खोकत उठू लागले. ॲव्हिसिन्नांनी हाताने न उठण्याची खूण केली, खोकला नीट पुन्हा पुन्हा कान भरून ऐकला आणि ते म्हणाले, 'यांना प्रथम वाफेची आंघोळ घाला... हमामखान्यात...'

दहा-बारा दिवस अंघोळ न घातल्यामुळे फक्त अत्तरे चोपडलेले अमीर हकीमसाहेबांचे शब्द ऐकूनच सुखावले. खुदाबक्ष पुढे येऊन ॲव्हिसिन्नाना काही सांगणार तोच ॲव्हिसिन्नानी त्याला खूण केली. 'हे सर्व पडदे काढून टाका. खोलीत प्रकाश यायला हवा. भरपूर उजेड-वारा-धूळ आली तरी चालेल, पण पडदे हटवा.'

तरीही चेवाचेवाने दुसरा राजपुत्र खुदाबक्ष पुढे आला आणि अडमडत म्हणाला, 'अब्बाजानच्या अंगात बुखार-'

'हकीम मी आहे. मला कळते.' ॲव्हिसिन्ना एकदम त्याला तोडून म्हणाले. कडवट चेहरा करून खुदाबक्ष आणि दमादानच्या राजघराण्यातली बिबी दिवाणखान्यातून बाहेर पडले. तोंडे वेडीवाकडी करून...

तीन-चार दिवस असेच गेले...

रोजच्या वाफेच्या गरम गरम शेकाने अमीरसाहेबांना थोडाफार आराम पडत होता. दिवाणखान्यातला सगळा गळाटा ॲव्हिसिन्नानी पार तात्काळ हलवला. दिवाणखाना एकदम स्वच्छ दिसू लागला. कफाची फडकी, जडी-बुटीची औषधे, धूप व अंगारे-ताईत-इतकेच काय एका कोपऱ्यात मंत्र-तंत्र जादूटोणा करणाऱ्या मांत्रिकांचे उदबत्त्या -उद, लिंबू-मिरच्या, माणसाची कवटी आणि हाडे वगैरे सर्व सामान खुदाबक्ष राजपुत्राच्या आज्ञेने आत आले होते, ते गेले. इतकेच नव्हे तर आता दिवाणखान्यात फक्त बुढ्ढी मां आणि अमीरची बेगमसाहेबा याशिवाय कुणालाही यायला मज्जाव केला गेला.

ही गोष्ट खुदाबक्षाला फारच लागली. त्याचा एक हबशी नोकर अमीरसाहेबांचे पाय चेपत सतत दिवाणखान्यात असे. त्यालाही मज्जाव झाला. त्यामुळे खुदबक्षाला आतल्या हालचाली, बोलणी कळेनाशी झाली... तो अक्षरशः अस्वस्थ झाला.

मरीज अमीरसाहेबांची एक प्रथा होती. दिवसातून पाच वेळा नमाज पडून झाल्यावर ते आपल्या कुटुंबातील सर्व माणसांना प्रेमाने कवटाळत. अगदी वयस्कापासून ते काल-परवा जन्मलेल्या नातवंडापर्यंत हा नियम लागू होता. खोकत खोकत , खोकल्याची उबळ इकडे तिकडे हबके उडवत, थुंकीचे फवारे ... ही प्रथा ॲव्हिसिन्नानी ताबडतोब बंद केली. नमाज पढायचा पण मरीजाला कवटाळायचे नाही.

आठ-दहा दिवसांनंतर ॲव्हिसिन्ना अमीराबरोबर अनेक विषयांवर गप्पा मारू लागले. अमीरला झालेला रोग हा 'मौत की खाँसी' नसून एक खोकल्याच्या प्रकार आहे हे त्यांच्या ध्यानात आले. दिवाणखान्यात एकांतात गप्पा टप्पा मारताना त्यांच्या अनेक घरेलू गप्पाही होऊ लागल्या. आणि एका बेसावध क्षणी ते म्हणून गेले, 'माझ्या डोक्यावर गझनीच्या सुलतान महंमदाने १०,००० दिनाराचे बक्षीस लावले आहे. इतकेच नव्हेतर आपण आणि आपला मित्र मसीही गुंगारा देऊन सटकलो. पुढे आपल्याला दमादानच्या राजपुत्राने तुरुंगात डांबले -तिथून आपण शिताफीने निसटलो'... हेही त्यांनी समोर ठेवलेले फराळाचे पदार्थ 'सुक्कर नबात' (कलिंगडात खडीसाखर पेरलेली) आणि 'नाबाझ' नावाची बेदाण्याची चविष्ट दारू ओरपत सांगितले....

आयुष्यात दैवाचे अनेक चढ उतार पाहिलेले ॲव्हिसिन्ना कुणालाच डरत नव्हते. पण मरीज अमीर मात्र घाबरून गेले. छातीवर हात ठेवून ते उठले तोच काहीतरी -मातीचा खुजा किंवा अत्तराची कुपी पडल्याचा आवाज झाला. कुणीतरी पळालेय असेही दोघांच्या लक्षात आले...काय झाले असावे याचा अंदाज बांधून अमीरांनी टाळी वाजवली.

एक नोकर आत आला.

'बबरू हबशी कुठे आहे ?' त्यांनी नोकराला विचारले.

नोकर तडका-फडकी बाहेर गेला आणि लगेचच आत येऊन अदबीने म्हणाला, 'खुदाबक्ष राजपुत्राकडे जाताना एका दासीने पाहिला. पण मी त्याला थोड्या वेळापूर्वी इथेच कुठे तरी सुरईशी पाहिला होता... कळत नाही कुठे भागला...'

'ठीक आहे. तू घोड्याच्या पागेत जा आणि लपून बस. समजा आपला सर्वात जलद घोडा 'आरझू' जर कुणी बाहेर काढला तर मला येऊन सांग... जा..' असे म्हणून अमीर ढसा ढसा खोकू लागले आणि ॲव्हिसिन्ना अलगद त्यांच्या जवळ सरकत त्यांना पाणी देऊ लागले.

तोच नोकर पुन्हा आत येऊन कुर्निसात करून म्हणाला, 'आरझ घोडा नेण्याला मज्जाव का...'

'नाहीऽऽ!' अमीर अक्षरशः छातीवर हात ठेवत खिंकाळले. मग शांतपणे म्हणाले, 'फक्त

मला येऊन सांगायचे... जा.. तकलिया...!

गप्पांमधले ॲव्हिसिन्नाचे शब्द ऐकून अमीरसाहेब अस्वस्थ झाले होते. त्याला कारण होते. सुलतान गझनीचा फतवा, दमादानच्या तुरुंगातून पलायन या दोन गुन्ह्यांमुळे ॲव्हिसिन्नाना पकडण्यात तर येईलच, शिवाय खुदाबक्षची बिबी आणि आपली सून या गोष्टींचे भांडवल करून दमादानच्या सुव्वर राजपुत्राला पेटवून देईल. ती त्याच राज्यातली. दमादानच्या अमीराशी गोडी वाढावी म्हणून आपण ही शक्कल काढली, पण तीच आपल्या अंगाशी आता येणार... बबरू हबशी जे कानावर आले ते ताबडतोब खुदाबक्षला सांगणार. खुदाबक्ष आरझू घोड्यावरून कुणालातरी दमादानकडे पिटाळणार. ज्या हकीमाने आपल्याला दिलासा आणि नवे चैतन्य दिले त्यालाच हातकड्या पडणार आणि हे सर्व एक सच्चा अरब असून आपल्याला बघावे लागणार... इकडे आड तिकडे विहीर अशी आपली स्थिती झालीय. ज्याने जान वाचवली त्याला हातकड्या....

लोडावर मान टाकून आढ्याकडे ते पहात असतानाच नोकर आत आला आणि म्हणाला, 'आत्ताच माझ्यासमोर खुदाबक्षांच्या राणीसाहेबांनी 'आरझू' घोड्याला आणण्याचा हुकूम दिला आहे.'

'ठीक आहे' अमीर नोकराला घालवून म्हणाले, 'हकीमसाहेब, किती जलद घटना घडतायत पहा.'

'तुम्ही उगाच चिंता करताय.' ॲव्हिसिन्ना अमीरांना म्हणाले, 'या वागण्याने खासी...'

'तुम्हाला पुढे काय घडणार आहे याची कल्पना येत नाही. अजून तुम्ही 'मौत की खाँसी' मध्ये गुंतून राहिले आहात. शिर सलामत राहून मगच तुम्ही या रोगावर चिंतन करा. इन्शाल्ला...' असे म्हणताना ते थांबले. त्यांनी टाळी वाजवली आणि आलेल्या नोकराला ते म्हणाले, 'आम्हाला राजपुत्र काबाबक्ष ताबडतोब हवेत. बोलवा त्यांना.'

पळभरात काबाबक्ष आदबीने आत आला. त्याला जवळ येण्याची खूण करून अमीरसाहेब हळू म्हणाले, 'हकीमसाहेबांच्या जिवाला काही दगाफटका होण्याची शक्यता आम्ही हेरली आहे. तर असे करा- ताबडतोब उंटांच्या तीन गाड्या तयार करा. एक पूर्वेला जाईल. एक पश्चिमेला. दोन्हा गाड्या रिकाम्या जातील. तिसऱ्या गाडीतून हकीमसाहेबांना टेकडीच्या मागे नहिसाबाद गावी न्या. हकीमसाहेब कुठल्या गाडीत बसले आहेत त्याची वर्दी बाहेर पडता कामा नये. कळले ?'

'हो'. काबाबक्ष अदबीने म्हणाला,

'या तीन गाड्या एकदम सुटल्या की हकीमसाहेबांची नेहमीची घोडा गाडी रिकामी

पिटाळा. गाड्यांची तयारी झाली की मद्याची रिकामी सुरई घेऊन एका नोकराला आमच्याकडे धाडा... कळले ?'

तडाख्याने घेतलेले ते निर्णय पाहून ॲव्हिसिन्ना म्हणाले, 'अमीरसाहेब, आतातरी तुमच्या लक्षात आले ना, की तुम्हाला स्वत:ला 'मौत की खांसी' झालेली नाही. ती झाली असती तर मेंदू जागेवरच राहिला नसता...'

अमीरसाहेब मंद-क्षीणपणे हसले आणि म्हणाले, 'हकीमसाहेब-ॲव्हिसिन्ना उर्फ अबु-अली-अल् हूवेन इब्सीना, माझ्या गुप्त हेरांकडून मला तुमची सर्वच माहिती कळली होती. पण आता मी मात्र पेचात आलोय. मला 'मौत की खाँसी' झाली असती तर काही वाटले नसते. पण... एक सच्चा अरब म्हणून मला मरायचे आहे.'

'अहंऽऽ जगायचे आहे,' ॲव्हिसिन्ना म्हणाले.

मग मात्र ते दोघेही हसू लागले.

दिवाणखान्याच्या दारावर टक टक झाली.

बबरू हबशी पाण्याची सुरई घेऊन आत आला. त्याला पाहताच अमीर साहेब संतापाने म्हणाले, 'तू कशाला आला ? पाणी कोणी मागवले ? सुव्वर!'

तेवढ्यात मद्याची रिकामी सुरई घेऊन पूर्वीचा नोकर आला. त्याने आणलेल्या सुरईकडे पहात बबरू हबशी डोळे मोठे करून निघून गेला...

दोघेही बाहेर पडताक्षणी अमीरसाहेब म्हणाले, 'ॲव्हिसिन्नासाहेब, निघा तुम्ही. खुदा तुमचे रक्षण करो. जे माझ्या हातात होते ते मी केले. आता काही दिवस तरी तुम्ही कुठे तरी लपून छपून रहा.'

राजवाड्याच्या सौधावरून लपून पाहणाऱ्या खुदाबक्ष आणि त्याची बिबी यांना कळेना, चारपैकी कोण कुठल्या गाडीतून कुठे-कशासाठी गेले ? 'आरझू' घोड्याला आपण चावडीकडे पिटाळले. पण हकीमसाहेब नेमके कुठल्या गाडीतून गेले ? आणि कुठे ?

आता काळोख पडायला लागला होता. इस्पहान शहराच्या टेकडीकडच्या भागातून चंद्र बराच वर आला आणि चांदण्यात तो प्रदेशही न्हाऊन निघाला. चंद्रप्रकाशात गावातल्या मशिदीचे निमुळते मिनार सुस्पष्ट दिसू लागले. टेकडीपलीकडे एक उंटाची गाडी झपाट्याने जात होती. या गाडीने बघता बघता टेकडी ओलांडली आणि ती आता वालीदशा दर्जी यांच्या गावात शिरली. तळे लागले तसे ॲव्हिसिन्ना गाडी हाकणाऱ्याला म्हणाले, 'थांबव. मी इथेच उतरतो!' असे म्हणून ते उतरले. गाडी माघारी निघाल्यावर ते त्वरेने जुनाट दर्ग्याच्या रोखाने निघाले. तो त्यांना लगेच दिसला. पण रात्र बरीच झाल्यामुळे रस्ता निवांत होता. सगळीकडे

भन्नाट शुकशुकाट होता. आता वालीदशा दर्जीचे घर हुडकायचे कसे ? यापुढे आपल्या तोंडाला लगाम घालायचा असा त्यांनी निश्चय केला आणि शांतपणे एकेक पाऊल ते टाकू लागले....

गावातली छोटी छोटी पांढऱ्या रंगाची घरे एकमेकाआड आपल्या काळ्या कुळकुळीत सावल्या स्तब्धपणे जमिनीवर टाकून निवांतपणे रवंथ करीत पडली होती. दर्ग्याजवळ एका घराच्या खिडकीजवळ ॲव्हिसिन्नांना कापडाचे छोटे छोटे, पालापाचोळी सालपटासारखे रंगीबेरंगी कपटे टाकलेले दिसले. हेच वालीदशाचे घर असावे असे समजून त्यांनी अलगद् दार ठोठावले.

दार उघडून वालीदशा बाहेर आला आणि ॲव्हिसिन्ना उर्फ इब्सीनला पाहून आश्चर्याने म्हणाला, 'इब्सीन तू ? या अशा अवेळी ?'

'होय मीच. तुझे शब्द खरे ठरले. घातपात...'

वालीदने त्यांना गप्प राहण्याची खूण केली. त्यांचा हात धरून तो एका झाकणीसारख्या फरशीवरच्या दरवाजा जवळ आला. कडी उचलून त्याने दार उघडले आणि आतल्या तळघराच्या शिडीवर पाय ठेवला. शिडी डगडगत होती. पण दिसत नव्हती.

... आत अंधार होता.

एका कोपऱ्यात एक तेलाचा दिवा मिणमिणत होता.तिथे एक मेज होते. मेजावर कुणीतरी म्हातारी व्यक्ती लिहित बसलेली ॲव्हिसिन्नांनी पाहिली. कडीचा आवाज ऐकून त्या दोघांची चाहूल लागून उठलेली व्यक्ती आता पुढे येणार तोच वालीद म्हणाला, 'अब्बाजान, हा माझा मित्र इब्सीन उर्फ ॲव्हिसिन्ना. पेशाने हकीम आहे. याला पकडण्यासाठीही तुमच्याप्रमाणेच अमीरने रक्कम लावलीय.'

ॲव्हिसिन्ना आश्चर्याने पहात राहिले.

मग त्या दोघांची मैत्री झाली.

वालीदशाचे ते सासरे, दम्याने ग्रस्त झालेले. अमीराच्या नीच, क्रूर, बेअकली मनात त्यांनी मुलांना शास्त्र विषय शिकवावा, पण त्यांना मात्र आवड होती ती ग्रीक भाषांतरे करण्याची. सॉक्रेटीस-प्लेटो-ॲरिस्टॉटलची त्यांनी अनेक भाषांतरे केली होती. तमाम किताबे वाचली होती.

म्हाताराबुवा ॲव्हिसिन्नांना म्हणाले, 'नाव का बदललेस तू तुझे बेटा ?'

ॲव्हिसिन्नांनी आपल्या आयुष्याचा सगळा इतिहास त्यांच्यापुढे ठेवला अगदी आताच घडलेल्या अमीराच्या राजवाड्यातील राजकारणापर्यंतचा; आणि म्हटले, 'आता मी इथेच या अंधाऱ्या तळघरात तुमच्याबरोबर लेखन करीन. मला वैद्यक संहिता (कॅनन ऑफ मेडिसीन)

लिहायची आहे...'

'व्वा, एकदम छान. बेटा, जे काही तू आज लिहून ठेवशील ते उद्याच्या पिढीला उपकारक ठरेल.' खोकत खोकत म्हातारबुवा म्हणाले.

'पण मला या लिहिण्यापेक्षा अधिक आवडणारी गोष्ट म्हणजे मरीज लोकांना दवा-पाणी देणे आहे.' ॲव्हिसिन्ना त्यांना म्हणाले, 'आज तुम्ही पहा. दर चार जणांमध्ये एक जण महाभयानक अशा मौत की खाँसीने पछाडलेला आहे. या रोगावर माणसाला ना उपाय सापडला आहे, ना माणूस या रोगाला काबूत ठेवू शकला आहे. मौत की खाँसी हा महाभयंकर रोग आहे. आपला अरब या रोगाने नुसता भेदरून गेलाय.जो तो खोकला झाला आणि महिनाभर राहिला की हवालदिल होतो. काय सांगू तुम्हाला, अहो छोटे छोटे बच्चे घेऊन लोक बिमारीस्थानात येत. हा! पंचवीस-तीसच्या वयात खोकल्याच्या संशय आला तर ठीक. या वयात रोग होणाऱ्यांची संख्या खूप आहे. मी आकडे जमा केलेत. पहायचेत तुम्हाला ?... खरा रोग होणाऱ्यांपेक्षा हा रोग आपल्याला झालाय असे मानणारेच खूप आहेत' असे म्हणून ॲव्हिसिन्ना आपल्या बटव्यातून काही कागद काढू लागले. त्या कागदांचे वाचन करू लागले.

वृद्ध म्हातारबुवांनी हात करून म्हटले, 'बेटा, तू हे 'मौत की खाँसी' चे वेड डोक्यातून काढून टाक.' तरीही ॲव्हिसिन्ना बटवा चाचपत राहिले.

ॲव्हिसिन्नांनी थोडा वेळ बटवा चाचपणे थांबवले आणि म्हटले, 'संपूर्ण आयुष्य एखाद्याने या रोगावर चिंतन-संशोधन करीत रहायला हवे.तरच काही तरणोपाय आहे...' असे म्हणून त्यांनी बटवा चाचपला. ॲव्हिसिन्नाना हाताने थांबवून म्हातारबुवा म्हणाले, 'बेटा, तू मौत की खाँसी पार डोक्यात घेतली आहेस. हा रोग महाभयंकर आहे हे मान्य, पण दर दोन-तीनशे वर्षांनी असा एखाद्या रोग तमाम मनुष्यजातीला सतावत रहातोच. काही काळानंतर त्यावर औषध निघते. रोग आटोक्यात येतो. म्हणून का एखाद्याने तो रोग डोक्यात घालून घ्यायचा? शिर सलामत तो पगडी पचास...'

म्हातारबुवांचे शब्द ऐकून ॲव्हिसिन्ना चपापले. अमीरसाहेब सुद्धा असेच म्हणाले होते. जीव वाचला तरच आपण मौत की खाँसीवर काही संशोधन करू शकू. ते विचार करू लागले....

त्यांना शांत बसलेले पाहून म्हातारबुवा म्हणाले, 'मी या तळघरात राहून प्लेटो-ॲरिस्टॉटलचे ग्रंथ भाषांतरित करतो. तूही कैदी हो. तुझ्या शिरावर सुलतानाने बक्षीस लावले आहे. तू आजपासून इथेच राहा. तुला तुझे जीवन आहे. जवान आहेस तू...'

'हो, पण माझ्या डोक्यात मौत की खाँसीचे छद्मी हसणे घुमतेय. क्षय रोगाने मला पागल

केलेय.सतत 'हा: हा: हा:' असे या रोगाचे हसणे माझ्यासमोर येतेय. ते मी कसे विसरून जाऊ ? सांगा ? आपण वयाने वडील आहात, ज्ञानाने मोठे आहात. हाहा:कार उडवणारी मौतकी....'

इतक्यात त्यांच्या कानावर खदखद हसणे ऐकू आले. म्हातारबुवा म्हणाले, 'ऐकलेस हे खदखदणे. तुझा मित्र तुझी वरती थट्टा- रेवडी उडवतोय. प्रेमाने थट्टामस्करी करत तू जग आणि मगच मौत की खाँसीबरोबर सामना कर. यक्षासारखे रूप आहे तुझे...'

'कर-कर' आवाज झाला. ॲव्हिसिन्ना एकदम गप्प बसले. वरचे झाकणाचे दार उघडले गेले.

शिडी उतरून बुरख्यामधली एक काळीभोर आकृती अगदी अलगद खाली आली आणि म्हणाली: 'अब्बाजान, मेहमान का खाना तयार हुआ है. आपण वर येता की इथे आणू ?'

ती एक मुलगी होती. वालीदची बायको असावी असा कयास बांधून झटकन् ॲव्हिसिन्ना पुढे आले आणि म्हणाले, 'खोकला कसा आहे? कमी झाला की नाही ?'

'खोकला ? मला कुठे खोकला झाला होता ?' असे म्हणून त्या मुलीने आपला बुरखा वर केला.

ॲव्हिसिन्ना अचंबित होऊन पहातच राहिले.

वालिदशाच्या बायकोसारखाच या मुलीचा चेहरा सुंदर होता.

गोरापान, धारदार नाक, तरतरीत डोळे आणि तुकतुकीत जवानलेले राजबिंडी रूप.. ते अक्षरश: भारावून गेले आणि तिच्याकडे टक लावून पहात राहिले...तीही त्यांच्याकडे.

म्हातारबुवा खोकत खोकत पुढे आले.

'बेटा', ते ॲव्हिसिन्नांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, 'एक बात बताने को भूल गया. मला दोन जुळ्यां मुली आहेत. वालीदशाची बायको तू पाहिली आहेस. ही तुझ्यासमोर यापूर्वी आली नव्हती. पण आज आली...आणि तुम्हा दोघांना एकमेकांकडे खिळून गेलेले पाहताना आता माझ्या डोक्यातली हिच्या लग्नाची काळजी मिटली आहे. तू तरूण आहेस. यक्षासारखे तुला रूप लाभले आहे. हुशार आहेस..इथे तळघरात राहून तू हिच्याबरोबर संसार कर. वरचे घर मोकळेच आहे तुम्हाला. तू इथे लेखन कर..ही माझी मुलगी दुनियाझाद तुला लेखनात सहाय्यक होईल. तिलाही ग्रीक-अरबी वाङ्मयाची आवड आहे. वालीदशाची बिबी शहराझाद घर सांभाळेल... हो, पण एक लक्षात ठेव.' असे म्हणून त्यांनी आपल्या मुलीच्या कानाजवळ हात नेऊन कानातले मोत्याचे कुडे दाखवले आणि ते म्हणाले, ''ही कानात मुखरिद म्हणजे

मोत्याचे कुडे घालते. शहराझादचे कान जन्मापासून फाटलेले आहेत म्हणून तिला कानात काही घालता येत नाही. एवढे एक लक्षात ठेवलेस तर तुझे भावी आयुष्य सुखात जाईल. कुठल्याही बिमारीस्थानात तू जाऊन क्षयरोग्यांची सेवा केलीस तरी अमीराचे सैनिक तुला एक ना एक दिवस पकडतील हे एक आणि दुसरे म्हणजे समाजातला किंवा तमाम मानव जातीचा क्षय हटवण्याचा मक्ता अल्लाने तुलाच दिला आहे असे नाही. कालांतराने हा रोग जाईल... अधिक जबरा दुसरा येईल...' असे म्हणून शिडीवर त्यांनी टुणकन् उडी मारली आणि अरबी सुरस कथेतील कोळ्याच्या जाळ्यातल्या जीनीइफ्रितासारखे म्हटले, 'तूच तुझे भवितव्य ठरव. मै चला!''

❖ ❖ ❖



जाबीर इब्न हय्यान

(इ.स. ७०२- इ.स. ७६५)

रसायनशास्त्राचा जनक असा उल्लेख ज्यांचा करता येईल ते जाबीर युरोपमध्ये 'गेबर' या नावाने ओळखले जातात. अरबी रसायनशास्त्राचा जनक असा त्यांचा उल्लेख होत असला तरी जगातील रसायनशास्त्राचा पाया त्यांनीच घातला असे म्हणता येईल. ग्रीक किंवा चिनी पंडितांना रसायन शाखेत फारसा रस वाटत नव्हता. त्यांनी या शाखेत लेखनही फारसे केलेले नाही. भारतात नागार्जुनांनी ही शाखा समृद्ध केलेली असली तरी केवळ वैद्यक शाखेचे एक उपांग म्हणून केली. अ-वैद्यक रसायनात त्यांनी रस घेतला नाही.

प्राचीन काळी मिसरी लोक रसायने तयार करीत. मृत माणसाचे 'ममीफिकेशन' म्हणजे मृतदेहाचे 'प्रेतावगुंठन' करून जतन करण्याची क्रिया मिसरी लोकांना साध्य झाली होती. तथापि त्यासाठी कुठली रसायने कशी, केव्हा वापरायची वगैरे माहिती त्यांनी अत्यंत गुप्त ठेवली. त्यामुळे रसायन अथवा 'किमया' हे शास्त्र अघोर विद्येकडेच झुकू लागले. अगदी इ.स.च्या १४/१५ व्या शतकापर्यंत हा कल कायम राहिला. त्यातून हीन धातूपासून सोने बनवणे आणि अमरत्व- चिरतारुण्य प्राप्त करण्यासाठी अमृतसेवन करणे या दोन गोष्टी रसायन शाखेशी जखडल्या गेल्या आणि या शास्त्रशाखेची वाढ आडोशाआड होऊ लागली.

'गेबर' यांच्या काळात कापूर- पारा- गंधक ही तीनच रसायने ठाऊक होती. शिरक्का म्हणजे ॲसिटीक ॲसिड याशिवाय अन्य आम्ल जगाला ज्ञात नव्हते. या पुरातन काळी गेबर यांनी गंधकाम्ल (सल्फ्युरिक ॲसिड) नत्राम्ल (नायट्रिक ॲसिड) वगैरे आपल्या रसशाळेत बनवले. रसायनशाळेला शिस्त असावी, स्वच्छता असावी असे दंडक त्यांनी आपल्या पुस्तकातून घालून दिले. पुढे या अरबी पुस्तकांची लॅटिनमधून युरोपातील अन्य भाषांत भाषांतरे झाली. 'Alembic' हा या शास्त्राशी निगडित असलेला शब्द अरबीतून आला आहे.

जगातील सर्व मूलतत्त्वे १७ या अंकात १: ३: ५: ८ या श्रेणीमधून बसलेली असतात असे ते मानीत असत. आज आधुनिक रसायनशास्त्र हे कमालीच्या प्रगत अवस्थेत पोहोचले असले तरी या शास्त्रावरचा 'किमये'चा बुरखा फाडण्याचे फार मोठे ऐतिहासिक कार्य गेबर - जाबीर इब्न हय्यान यांनीच केले हे मान्य करायला हवे. हे त्यांचे ऋण फार मोठे आहे. या व्यक्तिमत्त्वावर आधारित सुंदर विज्ञानकथा आता आपण वाचणार आहात.... ■

किमयेमधले अम्ल हरवले!

मन्सुरी महाल नावाच्या राजवाड्याकडे ते दोघे घोडेस्वार रपेट करीत होते. पण रपेट करताना मधेच दोघे जवळजवळ येत आणि रागारागाने बोलत, तर पुन्हा एक जण आपल्या घोड्याला पुढे पिटाळी. या दोन घोडेस्वारांपैकी एक वयाने मोठा दिसत होता, तर दुसरा अगदीच पोरसवदा वयाचा, असेल नुकताच तारुण्यात आलेला, असा होता. जो वयाने मोठा होता त्याचे नाव होते मसलत आणि दुसऱ्याचे नाव होते जाबीर. दोघांचे चेहरे-मोहरे आवळे-जावळे दिसत होते. त्यावरून कुणालाही तर्क करता आला असता की, हे दोघे सख्खे भाऊ आहेत, आणि तो तर्क खराही ठरला असता.

हमरस्त्याच्या टोकावर 'मन्सुरी महाल' राजवाड्याचे दार आले. तसा मोठा घोडेस्वार खाली उतरलेला पाहून धाकटा जाबीरही खाली उतरला. उतरता उतरता मोठा भाऊ धाकट्याला म्हणाला, 'एकदम रागाच्या भरात तू काही बोलू नको. नीट, डोके ताळ्यावर ठेवून वाग. तरुण आहेस, राग तुझ्या नाकावर असतो म्हणून म्हटले....'

धाकट्याने 'हो, हो' केले आणि तो आपल्या तपकिरी -सोनेरी घोड्याच्या अंगा-खांद्यावर प्रेमाने थोपटत राहिला.

आता घोडे बांधून दोघेही राजवाड्याच्या भव्य व सुंदर उद्यानातून पुढे चालत राहिले. हा बगिचा ऐटदार दिसत होता. मोठे मोठे उंच चिनार वृक्ष वाऱ्यावर डोलत होते. खाली जाई-जुई-मोगरा-गुलाब-चाफा वगैरे शोभिवंत फुले-झाडे बहरलेली होती आणि त्यामधून विटांच्या प्रशस्त पायवाटा दिसत होत्या. पायवाटांवरून चालणे सुलभ जावे म्हणून सुंदर सोनेरी वाळू पसरलेली होती. एका कोपऱ्यात पाऱ्यासारख्या शुभ्र चिळकांड्या उडवत एक कारंजे आपल्याच नादात मश्गुल झाले होते. छोटा जाबीर आजच हे सर्व पहात होता.

तरुण जाबीर कधी राजवाड्यात आलेला नव्हता. आज प्रथमच तो इथे आला. वजीरसाहेब, राजेसाहेब यांच्याशी पैशाची बोलणी त्याचा मोठा भाऊ मसलत करीत असे आणि तो स्वतः सदोदित आपल्या रसायनशाळेत प्रयोग करीत राही. सकाळी एका मदरसेत शिक्षक म्हणू जाई. किमयाशास्त्र हे शास्त्र असले तरी या शास्त्रात फार ढोंगबाजी चालते, हे तो शिकणाऱ्या मुलांना वारंवार सांगे... आवर्जून, तळमळीने सांगे...

जाबीरला शांतपणे चालताना पाहून त्याचा भाऊ मसलत जवळ आला आणि म्हणाला,

'तर समजले ना मी काय सांगतोय ते! आज कंदहार देशातून एक किमयागार राजेसाहेबांकडे येणार आहे. तो त्यांना लोखंडाचे सोने बनवून देणार आहे...'

''अशक्य, अशक्य!'' जाबीर एकदम ओरडला.

''अरे, पुन्हा दचकलास! मी हेच तुला सांगतोय की आपण राजेसाहेबांसमोर उभे राहतोय. डोके ताळ्यावर ठेवून वाग. ते राजे आहेत. 'हा म्हणता फा' चा हुकूम देतील. कळले मी काय म्हणतोय ते ?''

''हो कळले!'' मोठ्या भावाचा तो रागीट आवाज ऐकूनच जाबीर म्हणाला.

''काय कळले ? 'फा' म्हणजे काय ?''

''फा' म्हणजे फाशी!'' जाबीर म्हणाला.

तेवढ्यात आडव्या रस्त्याने दस्तुरखुद्द वजिरसाहेब आपल्या चार सहकाऱ्यांसह येत असलेले मसलतला दिसले. ते लांब होते. पण तरीही मसलतने त्यांना कुर्निसात केला. भावाचे ते वागणे पाहून जाबीर मनात खट्टू झाला. कशाला इतकी लाळ घोटायची ? कर नाही त्याला डर कशाला हवी ? असे त्याच्या मनात आले.

पण मसलतच्या मनात निराळाच गोंधळ उडालेला होता. कंदहार देशातून आलेल्या पाहुण्याने केसभर सोने जरी बनवून दाखवले तरी आपण क्षणार्धात नामशेष होऊ. केवळ आपला भाऊ त्याच्या प्रयोगशाळेत हा प्रयोग करतोय अशी थाप मारून आपण वजिराकडून अमाप पैसा उकळतोय. या पैशावर वडिलांचा पूर्वीचा औषधांचा धंदा आपण चालवला. जोड म्हणून कलप-अंजने-लेप-अत्तरे-दिकाक म्हणजे उटणे-शक्तिवर्धके बनवून बिमारीस्थानांना दिली. तो धंदा बरकतीत आला म्हणून शराबीस्थान खोलले. दारू-मटन-मांस-मच्छी याबरोबर अनेक 'हूर-अल्-ऐन' म्हणजे नाचणाऱ्या अप्सरांना नोकरीवर ठेवून अक्षरशः खोऱ्याने पैसा उकळू लागलो. 'खंजीर रुप्याचा करतोय' या शब्दातच आपला धंदा आता वर्णन करता येईल असा झालाय. पण हे केवळ आपला लहान भाऊ जाबीर लोखंडाचे सोने करतोय, अशी थाप मारून आपण केले. उद्या...

दारवानाने खाडकन् सलाम केला.ते दोघे आता 'मन्सुरी महाल' च्या मुख्य महालात शिरले. अनेक छोट्या मोठ्या सरदार दरकदारांनी हा महाल भरून गेला होता. पाय ठेवायला जागा नव्हती. पण मसलत जाबीरचा हात धरून वाट काढीत पुढे गेला. त्याने न येणे आज भागणार नव्हते. कदाचित उद्या त्याच्या नावाने फतवा निघाला असता आणि त्याच्या मुसक्या बांधून त्याला जाबीरसकट नेले असते.

सर्वजण राजेसाहेबांची वाट पहात होते. किमयागार कंदहारीने स्वतःच्या प्रयोगासाठी

एक अजब वातावरण तयार केले होते. मध्यभागी एका लाकडी खुर्चीवर अनेक भांडी, एक भट्टी ठेवलेली होती. भट्टी खूप तापलेली होती. सभोवती अनेक फुले, धूप, धुराची वर्तुळे, काळा बुक्का आणि माणसाची एक कवटी ठेवलेली होती. कंदहारीचा पोषाखही भडक अजब होता.

इतक्यात राजेसाहेब आपल्या लवाजम्यासह आत आले आणि स्थानापन्न झाले.

किमयागार कंदहारीला घेऊन अरब सरदार पुढे आला. मसलतने ताबडतोब त्या अरबाला ओळखले. आपल्या वाईटावर असलेला हा आपला दूरचा नातेवाईक. याच्या पडत्या काळात आपण याला मदत केली आणि आज...

कंदहारी किमयागाराचा हात उंच करून हा अरब सरदार म्हणाला, 'लोक हो, माझा हा कंदहार प्रांतातला दूरचा मित्र आपल्या राजेसाहेबांसाठी एक प्रयोग करणार आहे. लोखंडी खिळ्यातून सोने...'

त्याचे बोलणे ऐकून लोक गडबड करू लागले. लोखंडाचे सोने करणे म्हणजे केवढा मोठा चमत्कार. केवळ अल्ला जे करू जाणे ते हा माणूस करतोय. लोकांचा गोंगाट आता वजिरसाहेब पुढे आल्यामुळे थांबला. तेवढ्यात कंदहारच्या किमयागाराने चिनी मातीची मूस उपडी करून दाखविली. या मुशीत काही नाही हे त्याने लोकांना, राजेसाहेबांना आणि वजिराला दाखवले.

मग बोटाच्या पेराएवढा लोखंडी खिळा त्याने राजेसाहेबांकडे पाठविला. त्यांच्याकडून तो परत आल्यावर तो त्याने चिनी मातीच्या मुशीत ठेऊन ती मूस भट्टीवर तापत ठेवली. स्वत:चे डोळे मिटून काही मंत्र म्हटले. भट्टीला फुले वाहिली. जवळचा डमरू वाजवून चार दोन आवाज काढले आणि तो मान गुढघ्यात घालून शहामृगासारखा स्तब्ध बसला. जसा काही हा गूढ मंत्र म्हणतोय असा.

मूस तापत होती. वाफा बाहेर पडत होत्या.

लोक टकामका एकमेकांकडे पहात होते. साधारण अर्ध्या कलाकाने त्याने मूस खाली उतरवली आणि काही मिसरी भाषेतील मंत्र म्हणत त्याने चिमट्याने करपट-काळपट झालेला खिळा महाराजांना दाखवला. तो खिळा लोकांकडे निरीक्षणासाठी पाठवून कंदहारी किमयागाराने राजेसाहेबांना मुशीत उरलेला एक सोनेरी केस दाखवला. हातात धरून तो केस त्याने लोकांना दाखवला.

... राजेसाहेबांसह सर्वजण त्या लकलकणाऱ्या सोनेरी तारेकडे पहातच राहिले. मसलतचा चेहरा जळलेल्या, करपलेल्या खिळ्याहून अधिक काळा करपट झाला. तो उठून बाहेर पडण्याच्या विचारात असताना जाबीर एकदम उठला आणि तरातरा राजेसाहेबांजवळ जाऊन उभा

राहिला. कंदहारी पाहुण्याची मूस हातात घेऊन तो म्हणाला, 'महाराज, कंदहारी पाहुण्यांनी अजब प्रयोग करून दाखविला आहे हे खरे. पण ही मूस मेणचट -तेलकट झालेय. सोनेरी केस मेणात लपवून मूस तापवलेली असावी असा संशय येतोय. म्हणून माझी विनंती आहे की, पाहुण्यांनी ही नवीकोरी मूस घेऊन हाच प्रयोग पुन्हा करावा... प्रयोग संपेपर्यंत सोनेरी केस महाराजांच्या हातात राहील.'

तरुण जाबीरचे बोलणे संपतेय न संपतेय तोच पाहुणा दरबारातून धूम धावत सुटला. त्याच्यामागे त्याचा अरब मित्र पळाला आणि त्यांना पकडण्यासाठी दरबारातील अनेक लोक, शिपाई दौडत सुटले...

महाराजांनी जाबीरला प्रेमाने जवळ घेतले आणि म्हटले, 'बेटा, तू आज आमचे डोळे उघडलेस. अनेकजण समाजाला असे फसवत राहतात. हे खरे असले तरी माणसाला अजरामर करणारे औषध, ज्या औषधाने तारुण्य प्राप्त होते ते औषध मात्र आम्हाला तुझ्याकडून हवे. आमच्या कानावर आलेय की हे औषध मिसरी हिंदू आणि चिनी लोकांनी बनविले आहे. या औषधासाठी आम्ही तुला प्रचंड पैसा देऊ. सोन्याचे दिनारांचे खजिने देऊ. पण हे औषध तू वर्ष-सहा महिन्यात आम्हाला तयार करून द्यायला हवे. जर ते तुला या मुदतीत म्हणजे वर्षभरात जमले नाही तर...

...असे म्हणून राजेसाहेबांनी वजिराकडे नजर टाकली.

वजिराने राणीसाहेबांकडे नजर टाकली. राणीसाहेबांनी आपल्या दासीकडे पाहिले आणि या पट्टराणीच्या पट्टदासीने पटकन् कंबरेजवळचा जंबिया- खंजीर बाहेर काढून तो लखलखीत खंजीर जाबीरकडे फेकला.

जाबीरने त्या लखलखीत धारदार खंजीराचा झेल घेतला आणि तो त्याकडे टक लावून पाहतोय तोच राजेसाहेब जवळ येत म्हणाले, 'पोरा, तू सूज्ञ आहेस. तुला सांगायला नकोच. एक तर वर्षभरात चिरतारुण्य देणारे औषधे तू आम्हाला तयार करून दे. अथवा याच खंजिराने खुदखुशी -आत्महत्या कर.'

....राजेसाहेब वजिराला हात करून चालू लागले. जाता जाता वजिराच्या कानात ते काही गुप्त खलबत करीत होते.

जाबीरच भाऊ मसलत झाल्या प्रकाराने विस्मयचकित झाला होता. जीवदान मिळाले होते. पण ते केवळ वर्षभराचे. नंतर पुन्हा गळ्याला फास हा बसणारच होता. जाबीरबरोबर तो आता घराकडे निघणार तोच दरबारी कारभारी पुढे आले आणि त्यांनी राजेसाहेबांचे जेवून जाण्याचे फर्मान त्यांना सांगितले. त्यांचा सन्मान होत होता पण तो मानेला दोराचा फास

लावून होणार होता.

राजेसाहेब धूर्त होते. विद्याव्यासंगाचा त्यांना ध्यास होता. अरबी तरुणांनी विद्याव्यासंगी बनावे यासाठी ते झटत असत. म्हणूनच त्यांनी तरुण जाबीरची परीक्षा पाहण्याचा विचार केला. जाबीर आणि त्याचा भाऊ मसलत या दोघांना दरबारी खान्यात अडकवून ठेवून ते स्वत: वजिराबरोबर वेश पालटून बाहेर पडले. मसलतचा शराबखाना कुठे आहे हे वजिर जाणत होताच. जाबीरची प्रयोगशाळा तिथेच कुठेतरी असेल असा अंदाज बांधून आता खुद्द राजेसाहेब आणि वजीर दोघेही वैदूचा वेश घेऊन, खांद्यावर जुन्या पुराण्या कातडी पडशा अडकवून शराबखान्यापाशी आले. आपण रानातून अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती आणून विकतो असे त्यांनी शराबखान्याच्या नोकरांना सांगताच त्यांना आत प्रवेश मिळाला.

आता संध्याकाळ होत होती आणि शराबखाना चांगला फुलासारखा उमलू लागला होता. नेहमीच्या शिरस्त्याने दारू पोटात ढोसणारे लोक शराबखान्यात गर्दी करू लागले होते.

वैदूचा खेडवळ पोषाख केलेले खलिफा राजेसाहेब त्या शराबखान्याचे ऐश्वर्य पाहून चकित झाले. अरेबियन नाईट्समधले दृश्य तिथे साक्षात उमटलेय असे कुणालाही वाटावे... बाहेर अनेक उंटांच्या घोड्याच्या गाड्या थांबलेल्या आहेत, आतून नाचगाण्यांचे, वाद्यांचे आवाज बाहेर पडतायत... एखादी नर्तिका लचकत मुरकत 'हूर अल् ऐन' म्हणजे स्वर्गीय अप्सरेसारखी आत-बाहेर करते आहे.... तिच्या पाठोपाठ दोन-चार झिंगलेले लोक बदमस्ती करतायत... ते दृष्य पाहताच वैदूच्या वेशातील खलिफांनी डोळ्यांनीच वजिरांना खुणावले, 'हे काय आहे ? रसायनशाळा कुठे गेली ? कुठे गेला तो जाबीर की फाबीर ?'

बाहेरचा हा थाट तर आत अनेक खोल्यांमध्ये याहून मोठा जल्लोष उडालेला. समोरच्या लाकडी मेजावर अनेक पेले, दारूचे चषक, बदाम पिस्ते वगैरे ठेवलेले... अनेक सुगंधी फुलांचे गुच्छ सभोवारच्या कपाटातून ठेवलेले आणि लोकांनी आपल्या हातात धरलेले दिसत होते. इतक्यात एका नोकराने त्यांच्यासमोर फळांनी भरलेले तबक आणले. या तबकात कस्तुरीचा सुवास लावलेले शंकरपाळे, मुरंब्यांचे अनेक वाडगे, गझल अल्-बनात म्हणजे शेवया होत्या. खलिफाच्या तोंडाला पाणी सुटतेय तोच मागून येणारा नोकर ओरडला, 'ए गधड्या, त्या खोलीत ने.' बिचारा काळा हबशी नोकर गांगरला. या लोकांसमोर ठेवलेले ताट त्याने दुसऱ्या खोलीत नेले....

'कोण तुम्ही ?' हबशाच्या अंगावर खेकसणारा नोकर म्हणाला.

'आम्ही वैदू-जडीबुटीचे औषध देणारे आहोत. आम्हाला वैद्यराज जाबीर...'

'जाबीर हवा ? मग सरळ पुढे जा. ' नोकर म्हणाला आणि आपल्या कामाला लागला.

वजीरसाहेब या उत्तराने आणि त्या वागणुकीने कमालीचे अस्वस्थ झाले. नाही म्हटले तरी शहेनशहापुढचे ताट उचलणे हा केवढा घोर अपमान. पण स्वत: राजेसाहेब वेश पालटून येण्याचा घोर का लावून बसले हे त्यांना कळेना.

.... तेवढ्यात ते एका नव्या दिवाणखान्याजवळ आले. इथले दृष्य अगदीच उलट होते. इथे अजिबात छान छोकी नव्हती आणि स्वच्छता चोख ठेवलेली दिसत होती. इथे अनेक भट्‌ट्या पेटलेल्या दिसत होत्या. अनेक तरुण मुले काम करीत होती. भट्‌ट्यांवरच्या भांड्यातून अनेक रसायने उकळत होती. कढया-भांडी-पळ्या-चमचे-अनेक चिनी मातीच्या मुशी इतस्तत: पडलेल्या होत्या. संपूर्ण दिवाणखाना कापूर-सोनामुखी -बचनाग रेवाचिनी -पारद यांच्या संमिश्र वासाने दरवळत होता. या दिवाणखान्याच्या मागच्या दारातून अंगणात जाता येत होते. आता रात्र पडल्यामुळे सर्वत्र काळोख दाटला होता.

'पळायची सोय आहे', राजेसाहेब दुसऱ्या वैदूच्या म्हणजे वजिराच्या कानात कुजबुजले. वजीर एकदम सावध होऊन मागे पाहू लागले. त्यांना मागून पावलांचा आवाज आला आणि क्षर्णाधात मसलत-जाबीर ही जोडगोळी त्यांच्यासमोर उभी राहिली.

'माफ करा, राजेसाहेबांकडे गेलो होतो' असे म्हणत जाबीराने त्या दोघा वैदूंना एका लाकडी मेजाजवळ बसवले. मेणबत्तीच्या मंद प्रकाशात तो त्यांची औषधे पाहू लागला.

चुळबुळ करणाऱ्या मसलतने वैदूंची काष्ठौषधे पाहून नाक मुरडत म्हटले, 'आम्हाला हवी आहे माणसाला अजरामर करणारी तारुण्यगुटिका. देणार आहात का ती ?'

दोन्ही वैदू गप्प बसलेले पाहून मसलत ओरडला, 'चला निघा इथून. या वाळक्या काड्या घेऊन आमचे काय होणार ? निघा चला...'

आता वैदू निघून जाणार तोच त्यांच्या मागे जात जाबीर म्हणाला, 'माफ करा, माझ्या भावाची मनस्थिती आज चांगली नाही. पुन्हा केव्हातरी या. मला तुमच्या काष्ठौषधीचा निश्चित उपयोग होईल. तुम्ही आलात - धन्यवाद. ही एक सोन्याची दिनार त्याबद्दल घ्या... पण आता इथे माझ्या भावा...

'अहो, पण तुमच्या भावाला झालेय तरी काय ?' वैदू झालेल्या खलिफांनी विचारले.

'काय सांगणार!' जाबीर हताशपणे म्हणाला. 'महाराजांना अमर करणारा दवा हवा. या जगात दोन अशक्य गोष्टी आहेत. एक लोखंडाचे सोने करणारा परिस दगड आणि दुसरे चिरतरुण बनविणारे औषध...'

'हे अशक्य आहे कसे म्हणता ?' खलिफा वैदूने विचारले.

'अहो ते शक्य असते तर त्याचा शोध यापूर्वीच आपल्या पूर्वजांनी नसता का लावला

? ही मेणबत्ती पहा' जाबीराने त्यांना तेवणारी एक मेणबत्ती दाखविली व तो म्हणाला, 'मी आता फुंकर घालून ही विझवतो' असे म्हणून त्याने मेणबत्तीवर फुंकर घातली. मग तो म्हणाला, 'माझ्यासारखा कस्पटासमान माणूस मेणबत्तीची जीवनज्योत विझवू शकतो तर अल्ला फुंकरीने एखाद्या अजरामर दवा घेणाऱ्याची जीवनज्योत का विझवू शकणार नाही ? अल्लाला सर्व माणसे सारखीच. गरीब-श्रीमंत, रंक-राव, लंगडा-पांगळा, हुशार-धूर्त, वेडा-बहिरा..'

सर्वत्र काळोख दाटला होता. ती संधी साधून वजिराचा हात धरून वैदू बनलेले राजेसाहेब एका मोठ्या तपकिरी रांजणाआड लपले. त्यांना स्पष्ट ऐकू येत होते. जाबीराची बडबड स्पष्टपणे त्यांच्या कानावर पडत होती. राजेसाहेब हळू आवाजात वजिरांना म्हणाले, 'पोरगा म्हणतोय ते योग्यच आहे.' त्यांचे शब्द ऐकून वजिरांनी त्यांना गप्प बसवले.

'अरे जाबीर, तू कुणापुढे बडबडतो आहेस ? ते वैदू केव्हाच निघून गेले.' असे म्हणून मसलत आपल्या लहान भावाला म्हणाला, 'हे बघ, फास आपल्या गळ्याशी लागला आहे. दिवस झपझप निघून जातील आणि वर्ष संपेल. काहीतरी दवा असा तयार कर की ज्याने राजेसाहेब उत्तेजित होतील, त्यांच्या अंगात चैतन्य संचारेल.'

'ते करता येईल.' जाबीर म्हणाला, ''आपल्या बागेत एक 'सुरसुर' वेल उगवते. या वेलीची बोटाएवढी डहाळी जरी कुठल्याही झाडावर फेकली तरी ही वेल वारेमाप वेड्यासारखी वाढत जाते. म्हणजे या वेलीची जीवनशक्ती अजब असते. अशा वेलीचे सत्त्व काढायचे. त्यात सदा हिरवेगार राहणाऱ्या निवडुंगाचे सत्त्व मिसळायचे आणि मद्यार्कातून हा काढा तयार करायचा...'

'वा! बहोत खूब!!' मसलत ओरडला.

'थांब. ऐक तर खरे.' जाबीर म्हणाला. 'आपण महाराजांना असे सांगू की, या काढ्याचा एक चमचा सकाळी सूर्य उगवण्यापूर्वी घ्यायचा आणि एक चमचा रात्री चंद्र डोक्यावरती आला की घ्यायचा. मधल्या काळात मद्यार्क, तंबाकू वगैरे मादक पदार्थांचे सेवन करता कामा नये.'

'महाराज ही अट पाळतील ?'

'अट पाळली नाही तर आपल्या मानेचा गळफास आपोआप सुटेल,' जाबीर म्हणाला.

'आणि महाराजांनी अट पाळली तर ?' मसलत एकदम आतुरतेने म्हणाला.

'तरीही सुटेल. कारण जर महाराजांनी अट पाळली तर महाराज झोपेतून उठतील. झोप मोडल्यामुळे बागेत फिरावयास जातील. व्यायाम घेतील आणि तंदुरूस्त राहतील. रात्री मद्यार्क न घेतल्यामुळे त्यांना झोप मिळेल. त्यांची प्रकृती एकदम निरोगी राहील आणि शंभर वर्षे

त्यांना आयुष्य लाभेल.' जाबीराने सांगितले.

'छान, छान' मसलत म्हणतोय तोच जाबीर म्हणाला, 'परंतु एखाद्या रोगाने महाराज ग्रस्त झालेच तर -' जाबीर थांबला.

'तर काय ?' मसलत पुढे येत म्हणाला.

'इन्शाल्ला! अल्ला त्यांना सुखी ठेवो.' असे म्हणून जाबीर आता जाणार तोच त्याचा हात काळोखात कुणीतरी पकडला. तो दचकून ओरडणार तोच वजीर पुढे झाले. डोक्यावरची टोपी त्यांनी खाली काढून टाकली आणि ते म्हणाले, 'मला तू ओळखत नाहीस. पण तुझा भाऊ मसलत मला ओळखतो.'

मेणबत्ती लावल्यावर मसलतला कळले की आपल्या समोर वैदू म्हणून जे दोन गृहस्थ आताच आले आणि ज्यांना हाकलून दिले ते खुद्द वजीर आणि खलिफा राजेसाहेब आहेत. तो गयावया करू लागला. तेव्हा महाराज हसले आणि त्यांनी जाबीरच्या गळ्यात आपल्या गळ्यातला मोत्याचा कंठा घातला. मग ते वजीराला म्हणाले, 'हा पोरगा खरोखरच विद्याप्रेमी आहे. याच्या रसायनशाळेला मोठी देणगी द्या. भरघोस पुस्तकांचा एक किताबखाना याला काढून द्या आणि तो जे मागेल ते सर्व झपाझपा देऊन टाका. याने आमचे दोन वेळा डोळे उघडले. एकदा, लोखंडाचा सोने करणारा परिसाचा दगड म्हणजे भ्रम आहे हे दाखवून आणि दुसरे म्हणजे, माणसाला अजरामरत्व प्राप्त होते ते गैर आहे हे पटवून... असे म्हणून खलिफा काळोखात उभ्या असलेल्या आपल्या घोड्याकडे जाऊ लागले.

❖ ❖ ❖



महमद इब्न मुसा अल्ख्वारिझमी

अलजिब्रा -बीजगणित या गणित शाखेचा संस्थापक असा ज्याचा नामोल्लेख होतो त्या अल्ख्वारिझमी यांच्या जन्म-मृत्यूंचा पत्ता लागत नाही. परंतइ त्यांनी स्वतःच्या ग्रंथात- 'अलशब्रवल मुकाब्ल'- हे गणितज्ञान आपण हिंदू लोकांच्या ग्रंथावरून भाषांतरित केले, असे लिहिले आहे. त्यानी हे बीजगणिताचे ज्ञान बहुदा ब्रह्मगुप्ताची पुस्तके भाषांतरित करून मिळवले असावे. अल्ख्वारिझमीचा काळ ८१०- AD नंतरचा, त्यांचा वर उल्लेखलेल्या बीजगणिताचा ग्रंथ जगभर-मुख्यतः युरोपमध्ये गेला आणि जगाला बीजगणित - अलजिब्रा - या ज्ञानशाखेची महती पटली - खरे म्हणजे ओळख झाली. भारतीय गणितज्ञांना बीजगणित ही शाखा आद्य आर्यभट्टापासून माहीत होती. आर्यभट्टांनी 'कुट्टके' म्हणजे बीजगणिती प्रश्न पुढे केले होते. ब्रह्मगुप्ताने तर त्यावर एक अध्याय टाकला. त्यातून हे ग्रंथ अरबांनी भाषांतरित केले आणि हे ज्ञान जगाच्या कानाकोपऱ्यात पसरवले.

खलिफा अल् मामून याने हिंदू-ग्रीक ग्रंथांची भाषांतरे करण्यासाठी एक मोठी पाठशाळा काढली होती. बहुदा अल्ख्वारिजमी या शाळेत मुख्याध्यापक असावेत अथवा त्यांनी भाषांतर केलेले ग्रंथ या पाठशाळेत प्रमाण म्हणून शिकवले जात असावेत.

अल् मामून खलिफा असताना अल्ख्वारिझमी यांच्या त्या काळात अरबी पंडितांनी पृथ्वीचा आकार खरोखरीच गोल आहे का? हे प्रत्यक्ष प्रयोग करून पडताळले: मेसापोटेमियामधल्या एका सपाट पठारावरच्या एका बिंदूपासून १ अंश अक्षांशापर्यंत उत्तर-दक्षिण दिशांना पंडितांचे दोन तांडे चालत गेले आणि असमान अंतराचे अचूक मोजमाप करून,त्यांनी पृथ्वीचे गोलत्व हे गरगरलेल्या कलिंगडासारखे नसून सुरणासारखे चपटे आहे असे अनुमान काढले. या प्रयोगाच्या वेळी अल्जिब्रा शाखेचा शोध लावणारे पंडित अल्ख्वारिझमी या प्रयोगात होते किंवा नाही हा एक गूढ प्रश्न आहे. ते असावेत असे वाटते.

ज्योतिष- गणित -वैद्यक या तीन शास्त्रांचा जगभर प्रसार अरब पंडितांनीच केला. त्यांनी अरबी भाषेत हे ज्ञान प्रथम आणले नसते, तर जगाची प्रगती मंदावली असती. अल्ख्वारिझमी यांच्यामुळे या गोष्टीची आठवण आज तीव्रपणे होते. बीजगणिताच्या किचकट पदावली, उदाहरणे सोडवताना 'अल्जबार' ची याद येते. ■

अल्जबार, अल्जबार...

बगदाद शहराबाहेरच्या सपाट मैदानावरून जाणारे ते दोन गृहस्थ जरी मळकट, साध्या वेषात होते, तरी पाहणाऱ्याला तात्काळ समजत असे की, हे दोघेही कुणीतरी राजमहालातील उमराव आहेत. दोघांच्याही तोंडावर तसे लखलखीत तेज होते.

दोघांपैकी जो तरुण होता तो वृद्ध, टक्कल पडलेल्या म्हातारबुवांना म्हणाला, ''वजीरसाब,'' पण त्या 'वजीरसाब' शब्दानेच तो दुसरा इसम दचकून हात जोडत म्हणाला, ''क्षमा असावी महाराज, मला फक्त अल्लाबक्ष असे म्हणा.'' त्यासरशी तो तरुण हसत म्हणाला, ''मी तुम्हाला एवढेच सांगतोय की या अल् मामून खलिफाने हजारो दिनार बिमारीस्थानांवर खर्च केले, तरुण संशोधकांसाठी वेधशाळा बांधल्या, मुलांना शिकवण्यासाठी मदरसा खोलल्या.... पण आजचे अरबस्थानातील तरुण अजूनही अरबी सुरस कथांच्या वातावरणातच वावरतायत्....''

''अहो ते होणारच! अल्फ लैला वा लैला या कथांची मोहिनी इतकी जबरदस्त आहे....''

''बस, बस...!'' वजीराला मधेच थांबवून खलिफा म्हणाले, ''हे आता आम्हाला नको आहे.. नवा अरबी तरुण उमद्या अरबी घोड्याप्रमाणे शस्त्र हातात घेऊन पळायला हवा. जीन, जादूटोणा, जखीण, इफ्रित-इफ्रिता फार झाले....''

तेवढ्यात जवळच्या खुरट्या जाळीत कुणीतरी कण्हतोय असा आवाज त्यांनी ऐकला आणि ते पुढे झाले. वजीर त्यांच्या मागोमाग गेला.

तिथे एक तरुण आडवातिडवा पडला होता. त्याच्या जवळच त्याची उंटाच्या चामड्याची पडशी पडलेली होती आणि पडशीतून काहीशी जुनाट ताडपत्री डोकावत होती. हस्तलिखिते दिसत होती ती..

''पाहिलंत अल्लाबक्ष हा तरुण सुरा पिऊन झिंगून पडलाय. '' खलिफा म्हणाले.

वजीर पुढे झाले. त्याच्या पडशीमधली काही पुस्तके सहज पाहिली आणि त्या तरुणाच्या हातपायांना हात लावून पाहत ते म्हणाले, ''महाराज, या तरुणाने दारू घेतलेली नाही.''

''मग काय तो बिमार आहे ?''

''बहुतेक!'' वजीर म्हणाले आणि तरुणाच्या खमीसामधून त्यांनी काही कंदमुळे, वाळक्या बिया काढल्या. त्या खलिफांना दाखवत ते म्हणाले, ''या बिया, कंदमुळे बेहोषी आणतात.'' असे म्हणून त्यांनी आपल्या आतल्या अंगरख्यातून चपट चामडी पिशवी काढली आणि त्या

पिशवीमधले पाणी तरुणाच्या तोंडावर शिंपडले.

उपाय लागू पडला. पाण्याने ताजातवाना होत तो तरुण एकदम 'अल्‌जबार वा ल मुकबला, अल्‌जबार, अल्‌जबार' करीत उठला. उठता उठताच त्याने झपाट्याने आपली पडशी घेतली.

"कोण तू ? इथे कसा आलास ?" सौम्य शब्दात खलिफा म्हणाले.

तरुण अजूनही बेहोषीतून पुरता बाहेर पडला नव्हता. तो म्हणाला, "मी माझी हकीकत सांगू ?"

"सांग, सांग!" खलीफा अधीर होऊन म्हणाले.

"तो कोळी आठवतो ? अरबी कथेतला. त्याच्याहून सुरेख आणि चमत्कारिक...."

"हे बघ. बडबड नको. तुझी हकीकत सांग." वजीर त्याला डाफरत म्हणाले.

"ठीक आहे. ऐका तर. मी याच शहरातला एक गरीब माणूस. मला लहानपणापासून वेड आहे ते गणिताचे."

"कसले ?" खलिफांनी विचारले.

"गणित. लाल तोंडी ग्रीकांचे गणित. म्लेंच्छ हिंदू लोकांचे गणित. हिंदू लोकांची गणिताची पद्धती शिकण्यासाठी मी एका कारव्यामधून, लमाणांच्या तांड्यातून तमाम देश पाहिले. हिंदू लोकांच्या देशात जाऊन अनेक ग्रंथ भाषांतरित करून ठेवले या पडशीत. त्यासाठी त्यांची भाषा संस्कृत मी शिकलो. ग्रीक भाषा शिकलो...."

तरुणाचे बोलणे ऐकता ऐकता खलिफा खाली बसले आणि म्हणाले, "पोरा बोल, पुढे बोल..."

"कारवाँ पुढे पुढे जात राही." तरुणाने सांगण्यास सुरुवात केली. "मी त्यातून अनेक शहरे भटकलो. रात्री लमाणाच्या मालकाची छोटी छोटी गणिते - व्यापार उदिमाची कामे मी करून देई. हिंदू लोकांची कुट्टकांची पद्धत मी चांगलीच शिकलो. ते लोक 'अल्‌जबार' नावाच्या पद्धतीने सटासट कोडी सोडवतात.चार हिरे, कापडाचे पाच तागे, दहा हात ऊस, पसाभर नमक या सर्वांची किंमत जर..."

तरुण थांबला. त्याने पाण्याची खूण केली. वजीराने पाणी दिले आणि म्हणाले, "या साहेबांना वेळ कमी आहे."

"नाही" खलिफा एकदम म्हणाले, "त्याला बोलू द्या! असे काही मला ऐकायला हवे आहे."

"अहो, तुम्ही भांडता कशाला ? माझे एकपट वय आहे, तुमचे दुप्पट तर यांचे तिप्पट.

वयाची एकंदर बेरीज कळली तर 'अल्जबार' पद्धतीने मी सटकन आपली वये काढीन.हां,तर मी काय सांगत होतो... लमाणांच्या मालकाला मी नफाच नफा मिळवून दिला. अरब दिनार दिले. त्याच्या मुलाला या अल्जबार गणित पद्धतीत मी तरबेज केले."

"आणि हा तुझा मालक तुझ्याशी कृतघ्नपणे वागला. त्याने तुला तळघरात कोंडून ठेवले."

"तुम्हाला कसे कळले ?" तरुणाने विचारले.

"बरोबर की नाही ?" वजीर म्हणाला.

"नाही. साफ चूक" तरुण म्हणाला.त्यासरशी वजीर आणि खलिफा या दोघांनी तोंडात बोटे घातली.

"माझा मालक कृतघ्न नव्हता. पण त्याची ती बायको - या बाईने तिच्या दोन गुलामांना काळे मांजर आणि पोपट बनवले आहे. ही बाई चेटूक -"

"हे बघ पोरा." खलिफा म्हणाले, "माझा या चेटूक वगैरेवर विश्वास नाही."

"तुमचा नसेल, पण माझा आहे. अहो मी मालकाच्या वेड्या मुलीबरोबर लग्न करायलाही तयार झालो होतो. पण तिच्या आईने ..." असे म्हणून तरुण थांबला. त्याने पडशीमधले कागद-हस्तलिखिते बाहेर काढली आणि तो म्हणाला, "मला लग्नात रस नव्हता. मला फक्त गणिताची जुनीपुराणी, वेगवेगळ्या देशातली, हिंदुस्थानातील हस्तलिखिते, पोथ्या हव्या होत्या.त्या घेण्यासाठीच मालकाबरोबर मी त्याच्या राजवाड्याकडे गेलो."

"राजवाड्याकडे ?" खलिफा आश्चर्याने म्हणाले.

"तर! अहो भला मोठा संगमरवरी वाडा ! त्याला राजवाडा म्हणायचे नाही तर काय म्हणायचे ? पण, माझेच नशीब खोटे."

खलिफा आणि वजीर एकमेकांकडे पहात असतानाच तरुण म्हणाला, "माझा मालक, लमाणधिपती त्याच्या बायकोला माझ्याबद्दल सांगायला गेला. तिच्या राजवाड्यातील तळघरात बऱ्याच जुनाट पोथ्या आहेत हे मालकाला ठाऊक होते. मी त्या जुनाट गुंफेत, राजवाड्याच्या मागच्या दारी खोळंबून बसलो. तेवढ्यात त्या काळ्या पुतळ्याने बोट लावून मला जागे केले..."

त्यासरशी वजीर आणि खलिफा दचकले. "कुणी बोट लावले, पुतळ्याने ?" वजीर म्हणाला.

"दगडाच्या पुतळ्याने ?" खलिफांनी एकदम विचारले.

"हो" तरुण म्हणाला.

तरुणाने इकडे तिकडे पाहिले आणि म्हटले, ''अज्ञात संख्येबद्दल एक अक्षर घेऊन हिंदू लोक कुट्टक सोडवतात. आर्यभट्टापासून ही पद्धती बहुधा चालत आली असावी. या प्रकारच्या गणित पद्धतीने अनेक समस्या सोडवता येतात.''

''पण त्या पुतळ्याचे काय झाले ?'' खलिफाने न राहवून विचारले. ''दगडी पुतळा बोट कसा लावेल ?''

''लावले. मी एकदम दचकलो.तेव्हा तो पुतळा म्हणाला, 'तुझ्यावर पहारा ठेवायला मला ठेवले आहे, मालकाच्या बायकोने.' म्हणजे त्या तळघरातील चार पुतळ्यांपैकी एक पुतळा हा खराखुरा माणूसच होता. काळाकभिन्न हबशी.त्याचे डोळे हे फताडे. शरीर दणकट, राकट, रंग काळा पथ्थरासारखा काळा...''

वजीर विचारात पडले असतानाच खलिफा हळूच त्याच्या कानात म्हणाले, ''ते ठिकाण याला दाखवायला सांगा.''

''तू ते ठिकाण आम्हाला दाखवशील ?'' वजीराने तोंड जवळ नेऊन प्रश्न केला.

''अलबत! पण त्या गुहेत आपल्याला मागून शिरायला हवे. कारण असे की, जर मालकाच्या बायकोला सुगावा लागला तर ती आपल्या तिघांनाही काळी मांजरे बनवून टाकेल. अरबी कथेतील चौदाव्या की पंधराव्या रात्रीच्या कथेसारखी.''

खलिफांच्या कपाळावर आठी उमटली, तसा तरुण म्हणाला, ''अहो, अल्‌जबार या गणिताच्या पद्धतीत (बीजगणितात) संख्येबद्दल अ....ब....क.... अशी अक्षरे धरून मग खरेखुरे उत्तर जर अचूकपणे काढता येते तर माणसाचे मांजर, मांजराचा माणूस कुणी केला तर त्यात आश्चर्य कसले आलेय ! तर मी काय सांगतो - त्या गुहेत मी आपला आरामशीर दगडावर पाय पसरून बसलो होतो. तेवढ्यात पुतळ्याने बोट लांबवून माझ्या खांद्याला खाजवले. मी चरकलो. मित्र हो, अहो त्या तळघरात मिणमिण अंधार होता. कुबट वास होता. घळीघळीतून सर्वत्र पाणी ठिबकत होते आणि अशा वेळी - म्हणजे अवेळी, एक पुतळा, दगडी पुतळा मला बोट लावून...''

''हा तुला भास झाला असले.'' वजीर म्हणाले. आणि दुसऱ्या गृहस्थाकडे, खलिफाकडे पहात म्हणाले, ''पाहू या तर याची अरबी सुरस कथेमधली गुहा-''

''तुम्हाला त्या गुहेत जायचेय का?''

''हो!'' खलिफा ताठ होत म्हणाले. ''मला तो राजवाडा, ती चेटकू करणारी मालकीण पहायची आहे.''

''मलाही तो बोट लावणारा दगडी पुतळा बघायचा आहे.''

"ठीक आहे. जाऊ या" असे म्हणून तो तरुण उठला व पडशी नीट व्यव्यस्थित खांद्यावर ठेवत म्हणाला, "अल्जबार, अल्जबार वा ल मुकबला."

लंगडत लंगडत त्याने वजीराचा हात पकडला आणि म्हटले, "पण प्रथम सर्पगृहातून आपल्याला वाट काढावी लागेल."

"काय ?" वजीर किंचाळून म्हणाले.

"होय ! त्या चेटूक करणाऱ्या मालकिणीचे सर्पगृह आहे. तिची मुलगी वेडी आहे ना, ती पळू नये म्हणून अनेक मोठमोठे जहरी नाग सर्पगृहात ठेवलेत." खलिफाही थोडे घाबरले आहेत असे दिसले.

तरुण पुढे निघाला.

चालता चालता तो म्हणाला, "सर्पगृहाच्या वाटेवरच्या दरवाजावर तीन सुसरी जबडा वासून उभ्या असतात. त्यातील मधल्या सुसरीच्या मुखातून, म्हणजे तिने तोंड उघडल्यावर उघड्या झालेल्या भागातून उडी मारायची...."

आता चढ संपून वाट खाली खाली जाते आहे असे दिसू लागले. उतारामुळे खलिफा आणि वजीर यांना थोडे बरे वाटू लागले. धाप लागत नव्हती. शिवाय उतार सुखकारक होता. पण मनावर अनावर दडपण आलेले होते. सर्पगृह, सुसरीची तोंडे, चेटूक करणारी बाई.... परंतु आता मागे वळता येणार नव्हते. तो तरुण मागे वळेल म्हणावे तर तो वेड्यासारखा "अल्जबार, अल्जबार" असे असंबद्ध काहीतरी म्हणत चालत होता.

एकाएकी तरुण एका घळीपाशी थांबला. त्याने जवळच्या कपारीजवळच्या एका दगडावर हात ठेवला आणि तो त्या दोघांना म्हणाला, "हेच ते ठिकाण! हा दगड दूर केला की सुसरीचा दरवाजा लागेल, नंतर सर्पगृह, नंतर हिरे-मोत्यांच्या अनेक राशी, पुढे चार दगडी पुतळे..."

"त्यातला एक पुतळा बोट पुढे करणारा, नाही का ?"

"अल्जबार, अल्जबार" तरुण म्हणाला आणि झटकन वळून त्याने दगड सरकवण्यासाठी जोर लावला. हळूहळू तो दगड सरकू लागला. खलिफा आणि वजीर डोळे मोठे करून आणि अवाक होऊन थोडे भीतीने तर थोडे कुतूहलाने समोर काय घडतेय ते पाहू लागले.

"ओपन सी-साम" वजीर थोडे गमतीने धैर्य आणून म्हणाले.

तरुणाने दगड सरकवता सरकवता मागे पाहिले आणि तो त्यांना म्हणाला, "सर्वच जागी अलिबाबाच्या गुहेचा मंत्र लागू होत नसतो. या गुहेचा मंत्र अल्जबार-अल्जबार असा आहे."

झपकन दगड दूर सरकला आणि त्या दोघांनाही आत भलेमोठे भगदाड आहे असे दिसले. तरुण रांगत रांगत आत गेला. खलिफा आणि वजीरालाही आत जावेच लागले.

ते दोघेही आत शिरले आणि आश्चर्याने पहातच राहिले. खरोखरच ती एक मोठी गुहा होती. काळोखाने गच्च भरलेली, सांदीफटीतून पाणी झिरपत असलेली.

त्याचं लक्ष समोर गेले. तरुण म्हणाला त्याप्रमाणे त्यांच्यासमोर मगरींच्या तोंडाचा एक दरवाजा होता. एकावर एक तीन मगरींचे जबडे ठेवून तो छोटासा दरवाजा केलेला होता. परंतु सुसर-मगरींचे ते जबडे निर्जीव आहेत, मेलेल्या मगरींच्या जबड्यांची रास केवळ उभी करून ठेवली आहे हे पाहून खलिफा म्हणाले, ''अरे तरुणा, हे तर मेलेले सांगाडे आहेत.''

''पण आलो तेव्हा ते खालीवर हलत होते. अल्लाशपथ मी आलो तेव्हा...'' तरुण म्हणाला.

वजीरांच्या अंगात आता धैर्य एकवटले आणि खलिफाही थोडे निर्धास्त दिसू लागले. तरुणाचे तोंड मात्र फारसे पडले नव्हते अथवा आपण काही चुकीचे सांगितले आहे असेही त्याला वाटत नव्हते.

''आता तुझे सर्पांचे घर पाहू'' वजीर त्याला म्हणाले आणि खलिफांचा हात हातात घेऊन पुढे पाऊल टाकू लागले. समोरचा रस्ता अंधारलेला होता. पण ते आता बरेच मोकळे मोकळे झाले होते. मनावरचे भीतीचे दडपण उतरले होते आणि हा तरुण माथेफिरू तर नाही ना, असेच वजीरांना वाटू लागले होते. आठ-दहा पावलात ते एका जुनाटशा खोलीजवळ आले. या खोलीत सर्वत्र कोळीष्टके, जाळी पसरलेली होती. अक्षरश: सर्पांचे आकार दिसावेत तशी जाळी - काजळलेली कोळीष्टके पसरलेली होती आणि जमिनीवरही सुंभाचे दोर, गवताचे दोर,दोरांचे तुकडे विखुरलेले होते. खलिफांनी एक दोराचा तुकडा उचलून तरुणाला म्हटले, ''पोरा, याला का तू साप समजलास ? अरे, हा तर दोरीचा तुकडा आहे.''

तरुणाचे त्याकडे लक्ष नव्हते. तो एका उजेडाच्या झरोक्याजवळ जाऊन पडशीमधल्या हस्तलिखितांमधे गुंग होऊन पडला होता. त्याचा हात धरून वजीर म्हणाले, ''बरे, आता तुझा पुतळा तर पाहू.''

वजीर असे म्हणतायत तोच ते एका मोठ्या खोलीत आले. या खोलीत भिंतीला टेकवून उभे केलेले चार दगडी पुतळे खरोखरच होते. पण ते पुतळे मूर्तिकाराने दगडातून घडवलेले होते. या चार पुतळ्यापैकी एका पुतळ्याचे बोट पुढे आलेले होते.

ते पाहून वजीर मनातल्या मनात खुदकन हसले आणि पोराला कसा भास झाला असावा या विषयी तर्क करू लागले. तेवढ्यात टपकन एका काळ्याशार रानमांजराने एका कपारीवरून आत उडी मारली आणि म्याँव केले. खलिफांची पाठ असल्यामुळे ते या आवाजाने दचकून गेले.पण रानमांजराला पाहून ते म्हणाले, ''काय रे तरुणा, हेच का ते तुझे चेटकिणीचे मांजर?''

आवंढा गिळून तरुणाने होकारार्थी मान हलवली आणि तो म्हणाला, ''मी जर या गुहेतून

सटकलो नसतो तर माझेही रूपांतर लमाणाच्या मालकिणीने मांजरात केले असते.''

''अरे, कसले चेटूक आणि कसले काय घेऊन बसला आहेस ?'' खलिफा तरुणाच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले. आपल्या खांद्यावरचा हात खाली करीत तरुण म्हणाला, ''ते, ते बघा, त्या कपारीआड मालकाच्या वेड्या पोरीचे दोन डोळे चमकताहेत आणि या दुसऱ्या कपारीआड....''

बोलता बोलता तो एकदम थांबला आणि खलिफांना पडशीमधली एक पोथी दाखवत म्हणाला, ''हिंदू लोकांनी हे गणित सोडवले आहे. त्यांच्या मते एकाच गणिताची दोन उत्तरे येतात. एक उत्तर धन स्वरूपी असते, दुसरे ऋण स्वरूपी. हे जे चार डोळे कपारीआडून पाहतायत त्यांचे स्वरूप असेच गणिती आहे. हे पहा''

$$\text{क्ष} = \sqrt{\frac{\text{अक} + \left(\frac{\text{ब}}{२}\right)^{२} - \frac{\text{ब}}{२}}{\text{अ}}}$$

अशी ही गणिती आकडेमोड दोघांना दाखवत तरुण माणूस त्यांच्या तोंडाकडे पहात राहिला.

तरुणाने हस्तलिखितावरची आकडेमोड खलिफा आणि वजीर यांना दाखवली. पण ती पाहून ते दोघेही एकदम गंभीर झाले. खलिफांना तर वाटू लागले की, हा मुलगा - तरुण मुलगा कामातून गेला असावा. त्याच्या डोक्यावर काहीतरी परिणाम झाला असावा. गणित विषय आणि समोरची अंधारी गुहा यांचा एकत्रित परिणाम या तरुणाच्या मनावर झालेला आहे. म्हणून त्या दोघांनी तरुणाने दाखवलेल्या हस्तलिखितावरून नजर काढली, ते गुहेच्या बाहेर जाऊ लागले.

तरुणही त्यांच्या पाठोपाठ बाहेर आला. समोर पसरलेल्या स्फटिकाच्या डोंगराकडे पाहता पाहता खलिफा एकदम वळले आणि तरुणाला म्हणाले, ''बरे, आता तुझ्या त्या मालकाचा राजवाडा तर दाखव आम्हाला.'' पण पडशीमधली जुनीपुराणी हस्तलिखिते वाचण्यात गुंग झालेल्या त्या तरुणाला खलिफांचे शब्द ऐकूच गेले नाहीत. वजीराने डोळ्यांनी खलिफांना खूण केली.ते दोघे तरुणापासून दूर गेले. वजीर खलिफांना म्हणाले, ''मला वाटते या मुलाच्या डोक्यावर अरबी सुरस कथा आणि गणित यांचा परिणाम झाला आहे. मुलगा कामातून गेलाय असे वाटते.''

''अजून निश्चित मला तसे वाटत नाही,'' खलिफा हळू आवाजात म्हणाले, ''त्याला जरा

त्याच्या मालकाबद्दल डिवचू या , काही हाती येईल.''

''ठीक आहे. ते मी करतो.'' वजीर म्हणाले आणि हस्तलिखितात गुंगलेल्या तरुणाला ते म्हणाले, ''माझ्या आता लक्षात आले. तरुण मुला, तुझ्या त्या लमाणाधिपतीने तुला काल संध्याकाळी येथे आणून सोडले आणि तो -''

''त्याच्या राजवाड्यात मालकिणीला माझी खबर द्यायला गेला. पण त्या चेटूक करणाऱ्या बाईने मालकाचे रूपांतर उंटात केले.'' असे म्हणून तरुण रडू लागला.

खलिफा जवळ आले. ते गहिवरून गेले होते. तो तरुण अंगापिडाने भरदार होता. त्याचे डोळे बुद्धिमत्तेने लकाकताना दिसत होते. एक इतका चांगला अरब मुलगा वाया गेला याचे त्यांना वाईट वाटत होते. ते त्याला म्हणाले, ''मुला, अरे इथे राजवाडा वगैरे काही नाही. पाठीमागे हा जो स्फटिकाचा पहाड दिसतोय ना त्याचा तुला राजवाडा म्हणून भास झाला. बहुतेकांना तो तसाच होईल.''

वजीर पुढे झाले आणि म्हणाले, ''माझ्या लक्षात आले तुला काय झालेय ते. मला एक सांग, तुला अरबी सुरस कथांमध्ये कमालीचा रस आहे ना ?''

तरुणाने तात्काळ मान हलवली.

त्यासरशी वजीर खलिफांकडे वळत म्हणाले, ''आता माझ्या लक्षात सर्व प्रकार आलाय. या मुलाला गणित आणि अरबी सुरस कथा या दोन प्रकारात कमालीचा रस आहे हे जेव्हा त्या लमाणाच्या मालकाला कळले तेव्हा त्याने डाव टाकला.''

''माझा मालक डाव टाकणारा नव्हता. तो एक अत्यंत नेक, साधा माणूस आहे'' तरुण एकदम म्हणाला.

''मी सांगताना मध्ये बोलू नको'' वजीर थोड्या घुश्श्यात म्हणाले, ''लमाणांच्या मालकाने व्यापार उदिमाची गणिते - कोष्टके याच्याकडून आपल्या मुलाला शिकवून घेतली. मुलगा जसा तरबेज झाला तसे त्या मालकाने ओळखले की आता आपल्याला या तरुणाची गरज नाही. म्हणून त्याने याला इथे या गुहेपाशी सोडले. स्फटिकाचा डोंगरकडा हाच आपला राजवाडा आहे अशी थाप मारली आणि याने गुहेतच रहावे म्हणून आपली बायको चेटकीण आहे असे सांगितले... अगदी पद्धतशीर डाव टाकला.''

वजीर हे सर्व सांगताना खलिफांचा चेहरा उजळत गेला आणि त्यांनाही ते पटू लागले आहे असे दिसू लागले. पण तरुण मात्र पडशीमधले कागदपत्र चाळत ''अल्जबार, अल्जबार'' असे म्हणत राहिला. ते पाहून खलिफांना राहवले नाही आणि ते एकदम म्हणाले, ''भल्या तरुणा, अरे हे तुझे 'अल्जबार' प्रकरण आहे तरी काय ?''

त्यांचे ते शब्द ऐकताच तरुणाचा चेहरा अत्यानंदाने फुललेला दिसू लागला. नसानसांतून उत्साह ओसंडू लागला. पडशी चाचपणे त्याने क्षणार्धात थांबवले आणि वळून तो म्हणाला, "प्रथमच तुम्ही शहाण्यासारखा प्रश्न विचारलात!"

"ठीक बाबा ठीक, तू शहाणा, आम्ही वेडे!" वजीर हताश होत म्हणाले.

"असे मी म्हणालो नाही. मी फक्त म्हणालो की प्रश्न शहाण्याने विचारण्याजोगा होता." तरुण म्हणाला.

खलिफा मधे पडले. तरुणाचा हात हातात घेत ते म्हणाले, "भल्या गृहस्था, कोण वेडे, कोण शहाणे हे आपण पुढे पाहू. प्रथम हे तर सांग की -"

"अल्‌जबार काय प्रकरण आहे," तरुणाने त्यांचे वाक्य पुरे करून म्हटले आणि तो खदखदून हसू लागला. एकाएकी हसणे थांबवून त्याने पडशीमधून काही हस्तलिखिते काढली व तो म्हणाला, "मी अर्ध्या जगाचा प्रवास पायी केला. अनेक देश पाहिले. अनेक लोक - त्यांच्या भाषा, धर्म, रीतीरिवाज पाहिले. ज्ञान मिळवले. ते अरबी भाषेत भाषांतरित केले. 'अल्‌जबार' हा माझा शब्द आहे. ती एक गणिताची नवी पद्धती आहे."

तरुण थांबला, त्याने पाय लांब केले, आळस झाडला आणि पुढे तो म्हणाला, "गणिताच्या प्रांतात फक्त आकडे वापरले जातात . पण हिंदोस्थांमधील लोक आकड्यांबरोबर अक्षरे वापरून गहन, डोक्याला बिमारी आणणारी गणिते चुटकीसरशी सोडवतात."

"पण या गणितांचा व्यवहारात उपयोग आहे ?" खलिफांनी विचारले. त्यांचा चेहरा आनंदाने खुलून येतोय असे स्पष्ट दिसत होते. नाही म्हणायला ते ज्ञानोपासक होते. खलिफा - सुलतान असले तरी ज्ञानाला किंमत देणारे होते.

"एक उदाहरण देतो," तरुण म्हणाला, "यांच्याजवळ १० उंट आहेत. पण त्यांना ४०० दिनार कर्ज आहे आणि तुमच्याजवळ फक्त १ उंट आहे आणि ५० दिनार आहेत. आता जर तुम्ही दोघे सारखेच श्रीमंत असाल असे मानले, तर उंटाची किंमत किती दिनार ?"

"किती ?" खलिफा वजीराला म्हणाले.

"किती ?" वजीर तरुणाला म्हणाला.

तरुण हसला आणि म्हणाला, "तेच या 'अल्‌जबार' जादूने अचूक काढता येते."

तरुणाने भरकन गणित मांडले आणि उत्तर काढून लगबग तो म्हणाला, "हे सोपे गणित झाले, पण एका झाडावर पोपट-बगळे-कावळे-चिमण्या सगळे सगळे पक्षी जरी बसले असले आणि त्यांचे एकमेकांशी असणारे प्रमाण आणि एकंदर संख्या कळली तर प्रत्येक पक्षी किती संख्येने झाडा..."

बोलता बोलता तरुण एकाएकी थबकला.दूरवर बोट दाखवत तो म्हणाला, ''तो पहा लंगडत लंगडत चालतोय ना, तो उंट म्हणजे माझा लमाणाधिपती. बिचाऱ्याच्या बायकोने त्याला चेटूक करून उंट करून टाकला.''

वजीराने तरुणाच्या खांद्यावर हात ठेवत म्हटले, ''वा तरुणा, तुझ्या मालकाने तुला फसवले. त्याचा उंट झाला काय किंवा गाढव...''

''नाही'' तरुण मान हलवत म्हणाला, ''माझा मालक एक नेक, सभ्य गृहस्थ होता. त्याने मला मुळीच फसवले नाही. अल्लाशपथ सांगतो...''

खलिफा आणि वजीर दोघेही हताश होऊन एकमेकांकडे पाहू लागले. तरुणाने पुन्हा पडशीमधली हस्तलिखिते वाचणे चालू केले आणि तोंडाने 'अल्जबार'चा धोशाही चालू ठेवला.

''या तुझ्या 'अल्जबार' गणिताने आकाशातील चांदण्या मोजता येतील का ?'' खलिफांनी प्रश्न केला.

''का नाही येणार ?'' तरुण पटकन म्हणाला, ''पण त्याला वेळ लागेल. अनेक हुशार अरब तरुणांना या शास्त्रात पारंगत करावे लागेल. लाल तोंडाच्या ग्रीक पंडितांचे ग्रंथ आणि हिंदू पगडी पंडितांचे ग्रंथ भाषांतरित करावे लागतील...''

''मग ते काम तू का नाही करीत ? सारखे आपले चेटूक चेटूक लावलेस. तुझ्यासारख्या विद्याप्रेमी माणसाने असल्या फालतू गोष्टींवर विश्वास का ठेवावा ?'' खलिफा म्हणाले.

त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनी त्याला नाव विचारले.

''अल्ख्वारिज्मी''तरुण म्हणाला.

''वा! अल्ख्वारिज्मी, उद्यापासून तू खलिफाच्या दरबारी गणिताचा पंडित म्हणून काम करू लाग. मी तुझी नेमणूक करीन.''

''सुलतान खलिफांच्या दरबारी माझ्यासारख्या गरिबाला कोण उभा करील ?'' तरुण म्हणाला.

''मी करीन. ही खुणेची माळ तू दारावरच्या रखवालदाराला दाखवलीस की तो तुला आत सोडील.'' असे म्हणून खलिफांनी अंगरख्याआड लपवलेली मोत्या-पोवळ्यांची माळ त्याच्या गळ्यात घातली आणि त्याला ममतेने जवळ घेतले.त्याच्या पाठीवर शाबासकी दिली.

तरुणाने माळेच्या एकदोन मण्यांवरून हात फिरवला आणि चकित झाल्यागत म्हटले, ''काय म्हणालात ? ही माळ दाखवली तर दरवान मला आत सोडील ?''

''हो, महाराजांचाच हुकूम आहे असे समजून दारवान तुला घेऊन आत राजवाड्यात जाईल.'' वजीर म्हणाला.

"म्हणजे चोर म्हणून की काय ?" असे म्हणून तरुण हसू लागला. खलिफा आणि वजीर दोघेही पोट धरून हसू लागले.

थोड्या वेळाने खलिफा म्हणाले, "तरुण मुला, एक सांग - सर्पगृह, चेटूक करणारी मालकीण, बोट लावणारा पुतळा हे सर्व तू का सांगितलेस ?"

"ते मी सांगितले नसते आणि अल्‌जबार असा कंठशोष करीत राहिलो असतो तर मला तुम्ही खरोखरीचा पागल ठरवले असते. गणिताला कोण विचारतो ? कुत्रासुद्धा विचारत नाही." असे म्हणून तरुणाने पुन्हा हस्तलिखितात डोके खुपसले आणि तो म्हणाला, "पण एक सांगतो, गणिताची ही नवी शाखा मी समृद्ध करीन. आज ना उद्या सर्व मानवतेला या 'अल्‌जबार वा ल मुकबला' चा फायदा होईल. आपला देश ज्ञानाने चमकेल."

वजीर आणि खलिफा त्या तरुणाकडे अवाक होऊन पहात राहिले. इतके ते त्याच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून गेले होते.

पुतळ्यासारखे स्तब्ध उभे असणाऱ्या त्या दोघांकडे तरुणाचे लक्षच नव्हते. तो हस्तलिखिते चाचपडत होता आणि तोंडाने 'अल्‌जबार, अल्‌जबार' असे म्हणत होता.

वाहणाऱ्या वाऱ्याने त्याचे ते शब्द 'अल्‌जबार, अल्‌जबार' दिगंतात सर्वत्र विखरून टाकले आणि जिथे जिथे ते शब्द सांदीकपारीत पडले तिथे तिथे त्या आवाजाचे, शब्दाचे प्रतिध्वनी उमटत राहिले - अल्‌जबार....

अल्‌जबार... अल्‌जिब्रा.... ऑल्‌जिब्रा....

ALGEBRA ....

❖ ❖ ❖

उमरखय्यामचा आयात

इ. स. १०व्या शतकातील प्रख्यात गणितज्ज्ञ उमरखय्याम याच्या नावाचा बहुदा विसर पडतो तो शास्त्रज्ञ म्हणून. एरवी एक प्रख्यात कवी म्हणूनच त्याचे नाव घेतले जाते आणि त्याचे कारण त्याच्या 'रुबाया'या चतुष्पदी काव्याचे प्रख्यात आंग्ल पंडित फिट्झजेराल्ड याने केलेल्या अप्रतिम भाषांतरामुळे.

त्याचे पर्शियन काव्य अधिक सुंदर आहे असे म्हणतात. उमरखय्याम गणिती होता. त्याने अनेक वेध घेऊन 'जलाली' पंचाग तयार केले होते. अलजबर-बीजगणित हा विषय त्या काळी नुकताच कुठे सुरू झाला होता.

या विषयावव उमरखय्यामने फार मेहनत घेतली आणि भूमितीच्या आकृत्या काढून बीजगणिते सोडवून दाखिवली. ज्याला युक्लिडची भूमिती येत नाही आणि अपोलोनियसचे कॉनिक्स माहीत नाही त्याला माझे 'अलजबर' कळणार नाही असे त्याने आपल्या ग्रंथात लिहिले आहे. उमरखय्याम सुफी पंथाचा प्रवर्तक होता.

त्याचे स्वत:चे जीवन-तत्त्वज्ञान अगदी विलक्षण वेगळे आहे. एका बाजूनं हा सुफी साधू पारलौकिक स्वास्थ्यासाठी पुण्यसंचयाला झिडकारतो, तर दुसऱ्या बाजूने तो, 'ऋण काढून सण साजरा करावा' या चार्वाकी चवितचर्वणातून निघणाऱ्या ऐहिक ऐश्वर्यालाही नाकारतो. आजकालच्या 'झेन' पंथियांहूनही त्याची विचारधारा वेगळी आहे.

अशा या एकमेव तत्त्वचिंतक-गणिती-कवी व्यक्तिमत्त्वाच्या माण्साच्या आयुष्यातील जुजबी राजकारणी स्पर्धेतून आलेला काल्पनिक प्रसंग निवडून त्याच्या आयुष्याचा एक कोपरा पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

■

ही आयाती यातायाती...

सोन्या-रूप्याने मढवलेल्या आणि हिरे माणकांनी चमचमणाऱ्या सिंहासनावर बसलेला पर्शियाचा सुलतान हालिकशा आज चिंतातूर झालेला दिसत होता. समोरच्या दरबारातल्या लोकांकडे त्याचे अजिबात लक्ष नव्हते. तो सारखा पांढऱ्या शुभ्र दाढीवरून हात फिरवत होता आणि त्याची ती बेचैनी पाहून त्याला वारा घालणाऱ्या दोन सुंदर दासी आता हातातला मोरपिसारी पंखा झपाझपा हलवू लागल्या होत्या. शेजारी उभा असलेला त्याचा वझीर उगाचच दरबाराकडे पाहू लागला. या दरबारात आपापल्या इभ्रतीप्रमाणे सरदार-दरकदार, वली, काझी, अमीर वगैरे शेख मंडळी बसली होती. एका बाजूला बसलेल्या एका सरदाराने वझीराकडे पाहून गुपचूप खूण केली. वझीराने मख्ख चेहऱ्याने त्याच्याकडे पाहिले पण तोंडावर मात्र अजिबात भाव न प्रगट करता तो इतस्तत: पाहू लागला.

तेवढ्यात सुलतानाने मान पुढे केली आणि शम्स-सुद्-दीन सरदारांच्या रांगेत बसलेल्या एका सरदाराला म्हटले, 'शम्स-सुद्-दीन, अल्ला शपथ सांगा तुम्हाला असे वाटते की उमरखय्याम लहान मुलांना बिघडवतो आहे ?''

शम्स-सुद्-दीन हा एक वयस्कर शास्त्रज्ञ होता. कंबरेवर हात ठेवत तो उभा राहिला आणि म्हणाला, 'सरकार, अल् कावरझामी-अल्हाझेन-अल् बेरुणीसारख्या महापंडितांनी या देशात शास्त्रीय ज्ञानाची सुरुवात केली. अल् कावरझामी यांनी तर जगात प्रथमच अलजबर - बीजगणित हा नवा गणिती प्रकार रुजवला. असा हा नवा गणिती प्रकार - अल्जबर उमरखय्याम उस्ताद लहान मुलांना शिकवतायत. भूमितीच्या आकृत्या काढून अल्जबरची गणिते सोडवणे-'

मोठे वाक्य म्हणून थोडे थकून गेलेले शम्स-सुद-दीन थांबले आणि दरबारातील कोपऱ्यात बसलेल्या अल्-निशार या सरदाराकडे बघून आणि कुत्सितपणे हसून म्हणाले, 'सरकार, माझ्या मते अशी गणिते सोडवणे आणि ती शाळकरी मुलांना समजावून देणे सोपे काम नाही. अल्लाची कृपा उमरखय्याम उस्तादांवर आहे म्हणूनच ते हे पवित्र काम करू शकतात.'

'पवित्र!' अल्-निशार हा सरदार एकदम डाफरून उठत म्हणाला, 'सरकार उमरखय्याम मुलांना काय गणित शिकवतात शंकाच आहे. हां! दारू आणि बदफैलीपणाच्या कविता ते जरूर शिकवतात.'

'इन्शाल्ला!' सुलतान गळ्यातल्या एका टपोऱ्या हिऱ्यावरून हात फिरवत पुटपुटला. तोच आणखी एक सरदार उभा राहिला आणि म्हणाला, ''सरकार, अल्-निशारसाहेबाशी मी सहमत आहे. उमरखय्याम जे अल्जबर शिकवतात ते म्हणजे एक जादूटोणा आहे. कसले अल्जबर घेऊन बसता. अहो, मदिरा आणि मदिराक्षीच्या कविता करणाऱ्याला का काही शिकवता येते?''

'सरकार! सरदार-दरकदाराना गणित-खगोल अल्जबर-विज्ञान-अल्केमी केव्हापासून समजायला लागली ?' एकविद्वान पंडित उभा राहून म्हणाला.

दरबारात एकच हशा पिकला. जो तो हसू लागला. तोच सुलतान मलिकशहाने राजदंड वर केला आणि म्हटले, ''सबूर, हा दरबार आहे. मला फक्त उमरखय्याम पोरा-टोरांची अभिरुची बिघडवतात का, हे ऐकायचे आहे. प्रत्येकाने फक्त आपले मत सांगावे.''

'कसे शक्य आहे हे ?' अल्-निशार तावातावाने उभा रहात म्हणाला. ''तलावातल्या माशाने 'मी पाण्याला स्पर्श करीत नाही' असा डांगोरा पिटण्यात काय हशील ?''

'अहो डांगोरा तुम्ही पिटताय! ज्या उमरखय्यामने जलाली पंचांग तयार केले तो मुलांना बेवकूफ कसा बनवेल ?' कुणीतरी एकजण म्हणाला.

'सरकार,' अल्-निशार सरदार पुढे येत म्हणाला, 'तुम्हाला सबूत-पुरावा हवा असेल तर हरुन-अल्-रशीद सारखे वेष पालटून तुम्ही माझ्याबरोबर चला. तुमचे तुम्हाला कळून येईल की उमरखय्याम पोरांना काय शिकवतात-गणित की...

'ठीक आहे. उद्या बांगियाने बांग दिल्यानंतर किंवा त्याही आधी सुभ-इ-काझिब होताच मी वेष पालटून निघेन. उमरखय्याम मोठे गणिती आहेत.' असे म्हणून मलिकशहा सिंहासनावरून उठला आणि दरबार सोडून निघून गेला.

एकेक दरबारी आस्ते आस्ते बाहेर पडला....

जो तो आपापल्या सवंगड्यामध्ये चर्चा करीत होता. चर्चेचे विषय उमरखय्याम, त्याचा अल्जबर हा नवा गणिती प्रकार, त्याच्या कविता, त्याने तयार केलेले जलाली पंचांग हेच होते. पर्शियन दरबारातील मान्यवर पंडिताना उमरखय्यामच्या गणिती ज्ञानाबद्दल कौतुक वाटत होते. पण त्याच खय्यामने मदिरा-मदिराक्षीच्या कविता कराव्यात याचे वाईट वाटत होते. जाणकार पंडत हळहळत होते. दरबारात फिर्याद रुजू झालेय. उद्या उमरखय्यामविरुद्ध निकाल लागला तर देहदंडाची शिक्षा होणार. गणित विषयात भर घालणारे एक असामान्य चैतन्य नष्ट होणार. निशारसारखा दुष्ट माणूस रुष्ट झाला की कुठल्या खालच्या पातळीवर जाईल हे कसे सांगावे! सुलतान आज उमरखय्यामला चाहतो आहे, वेधशाळा सुलतानाने बांधून

दिली, मोठे मोठे किताब दिले. पण अखेर तो सुलतान आहे. सत्ताधीश आहे. उद्या तो खय्यामला देहदंडाची शिक्षाही देईल...

....ज्या वेधशाळेचा उमरखय्याम मुख्य होता त्या वेधशाळतच तो लहान मुलांना शिकवत असे. ही मदरसाशाळा एका जुनाट किल्ल्यावर होती. त्या किल्ल्याच्या रोखाने दोन शेतकरी जात होते. पेहरावरून सहजच कळून येत होते की, हे शेतकरी नसावेत. आणि ते खरेच होते. या दोघांपैकी एक होता दस्तुरखुद्द सुलतान आणि दुसरा होता उमरखय्यामविषयी सुलतानाच्या मनात द्वेष पसरविणारा सरदार अल्-निशार.

'ही आलीच ती बाग.' अल्-निशार चालता चालता थांबून म्हणाला. 'याच बागेत उमर खय्याम हिंडत असतात.'

सुलतान थांबला. त्याने इकडे तिकडे नजर फिरवली. वेधशाळेच्या पायथ्याशी असणारी ही बाग फार सुंदर-खुबसुरत दिसत होती. बागेत अनेक वृक्ष बहरलेले होते. छोटी छोटी फुलझाडे बागेत डोलत होती. 'उमरखय्याम कवी आहेत.' शेतकऱ्याच्या वेषातला सुलतान म्हणाला, 'त्यांना बाग आवडणारच.'

'क्षमा असावी महाराज, खय्याम कविता करतात त्याचे वाईट वाटत नाही. पण त्या कविता दारूच्या असतात. शराबी वातावरणाच्या असतात.' सरदार अल्-निशार म्हणाला.

सुलतान साहेबाकडे वळून अल्-निशार पुन्हा म्हणाला, 'सरकार, या आजुबाजूच्या खेड्यात कुणालाही विचारा. ते सांगतील की एक सुंदर स्त्री या बागेत येते. खय्यामला मदिराचे प्याले भरून देते. खय्यामची मेहबूबा... आणि खय्याम...'

'मला बकबक नकोय. सबूत हवा.' सुलतान ओरडला.

'सरकार, खेडेगावातील लोक म्हणतात ते मी सांगितले. कदाचित ती बाई भूतयोनितली 'इफ्रिता' असेल.' सरदार अल्-निशार घाबरत म्हणाला-

'मला पुरावा-सबूत हवा.'

'जी सरकार.' असे म्हणून घाबरलेल्या सरदाराने एका कुंड्यांच्या वर्तुळावर उडी मारली.

अल्-निशार सरदाराने कुंड्यांच्या त्या उंचवटी चबुतऱ्यावर उडी मारली आणि कुंड्या ठेवलेला तो चबुतरा थोडा सरकला. मध्याभागी एक गोलाकार भुयार दिसायला लागले. या भुयारात उतरण्यासाठी लाकडाची शिडी ठेवलेली होती.

समोरचे दृष्य पाहून सुलतान चकित झाला आणि त्याच्या तोंडून उद्‌गार उमटले, 'अल्फ लायला वा लायला!' तो सरदाराने सुलतानाच्या तोंडावर हात ठेवला. पण आपण भलतीच पायरी चढत आहोत हे लक्षात येऊन त्याने तो हात मागे घेतला आणि शरमून 'दखील अक'

म्हणत सुलतानाची क्षमायाचना केली आणि तो शिडीच्या पायऱ्या उतरू लागला.

या भुयारात गुडूप अंधार होता. आतली वाट फार ओबड धोबड होती. जेमतेम एका माणसाला चालता येईल एवढी होती. जागोजागी या वाटेवर कोनाडे होते आणि त्या कोनाड्यात दारूच्या सुरया पडलेल्या होत्या. दारूची पिंपे होती. अल्-निशार दबलेल्या आवाजात सुलतानाला म्हणाला, 'पाहिलीत ही रिकामी पिंपे-सुरयांच्या चवडी रांजणांचे ढीग...'

... अल्-निशार बोलतोय तोच दुरून धप्प धप्प असा आवाज त्यांच्या कानावर आला. दोघेही चपापून, गर्भगळित होऊन भिंतीला लागून उभे राहिले. सुलतानाला घाम फुटला. हरुन-अल्-रशीदने असे प्रसंग पाहिले असतील का ? असा विचार तो करतोय तोच पावलांचा आवाज करणारा घूस आणि ससा यामधला एक प्राणी दूर पळून गेला. दोघांनी नि:श्वास टाकला आणि पलीकडच्या टोकाने ते बाहेर पडले.

आता ते वेधशाळेतल्या आतल्या भागात आले होते.

दूरवर उमरखय्याम उस्ताद एका शुभ्र चादरीवर त्यांचा वर्ग घेत होते. लहान लहान मुले त्यांच्या भोवती बसलेली होती. एका लाकडी फळ्यावर भूमितीची आकृती काढलेली होती. १०-१२ वर्षांचा एक गोरागोमटा मुलगा इतर मुलांना ही आकृती समजावून देत होता.

सुलतान पहात राहिला. मदिरा-मदिराक्षीच्या काव्याचे वाचन चालले असेल असे त्याला वाटले. पण निघाले भलतेच. भूमितीची एक आकृती आणि एक अल्जबर- बीजगणिताचे उदाहरण $क्ष^{२}$ + १०क्ष = ३९. तलम साध्या पोशाखातला ८९-९० वर्षांचा उमरखय्याम एखाद्या तरुण मास्तरासारखा कौतुकाने त्या गोऱ्या मुलाकडे पाहात होता, मधूनच सर्वांना गणित समजावून देत होता.

सुलतानाच्या चेहऱ्याकडे पाहताच आता अल्-निशार समजायचे ते समजला आणि मुकाटपणे भुयारी मार्गाने बाहेर पडला. जाता जाता सुलतानानेही त्याला काही विचारले नाही, सांगितले नाही.

राजवाड्यात येता येताच सुलतानाने वजीराला डाफरवले: 'सरदार अल् निशार आम्हाला फसवतोय. उमरखय्याम अजिबात वावगे वागत नाहीत. पोरांची अभिरुची नक्कीच बिघडवत नाहीत...'

सुलतानाचे वाक्य ऐकताक्षणीच गार झालेला वझीर नुसता स्तब्ध उभा राहिला. सुलतान त्याच्या जवळ आला आणि म्हणाला, 'आणि काय हो, ते भुयार काय उमरखय्यामसारख्या वृद्ध शिक्षकावर पाळत ठेवायला पोखरलेत ?'

'महाराज', वजीर घाबरत घाबरत म्हणाला, 'उमरखय्याम उस्तादांची मदरसा किल्ल्यावर

आहे. ही मदरसा वेधशाळेत भरते. वेधशाळा किल्ल्याच्या एका भागात आणि या किल्ल्यावर ते भुयार सरकारांच्या वालीदसाबनी, अब्बाजान यांनी करवून घेतले. आम्ही कशाला उमरखय्यामांच्यावर पाळत ठेवू ? त्यांचे माझे संबंध पूर्ण सलोख्याचे आहेत. पण -'

'- पण काय ?' वझीर बोलता बोलता थांबलेला पाहून सुलतान म्हणाला.

'सरकार, सर्वच जण उमरखय्यामच्या दारूच्या षौकाविषयी चर्चा करू लागलेत. किल्ल्याजवळचे लोक म्हणू लागलेत की...'

'की उमरखय्यामांच्या बरोबर एक सुंदर स्त्री बागेत दिसते, हेच ना! हाऽऽ हाऽऽ वझीरजी, तुम्ही आमच्याहून वयाने मोठे आहात. पण लक्षात घ्या. सुंदर कवितेचा हा परिणाम असतो. कारण असा कवी समाजाच्या ओठावरचे अबोल शब्द बोलत असतो. पण ते असो.'

सुलतान वझीराजवळ आला आणि त्याला म्हणाला, 'उमरखय्यामांनी कधी त्यांच्या कवितेचा उल्लेख तुमच्या जवळ केला होता ?'

'माझ्याजवळ ? छे!' वझीर दचकून म्हणाला, 'हां, पण आपले दफन पीचच्या वृक्षाखाली करावे असे मात्र ते मला म्हणाले. कवितेतून म्हणाले. ज्या ज्या वेळी वृक्ष बहरून येईल त्या त्या वेळी मीही बहरून जाईन, मृत्यूला न जुमानता, न मानता.'

'वा! वा!! बहोत खूब! काय कल्पना आहे सुंदर!' सुलतान खूष होऊन म्हणाला.

तेवढ्यात बाहेर हालचाल झाली. एका दूताने अल्-निशार आल्याची बातमी दिली. वझीर पुढे आला, अल्-निशाराजवळ गेला. दोघांची दबलेल्या आवाजात काहीतरी बोलणी झाली.

सुलतानाकडे येत वझीर म्हणाला, 'सरदार अल्-निशाराने उमरखय्याम उस्ताद पोरांची अभिरुची बिघडवतात याचा पुरावा - सबूत आणलाय.'

'मग आणा तो समोर. खय्याम कितीही मोठे गणितज्ज्ञ असोत.ते दोषी ठरले तर आम्ही त्यांना शिक्षा करू.' सुलतान म्हणाला.

अल-निशार सरदाराने एका माणसाच्या मदतीने एक जुनाट संदूक ओढत ओढत समोर आणली आणि म्हटले, 'सरकार, या संदुकीत काय आहे हे मी पाहिलेले नाही. पण ही पेटी उमरखय्याम यांनी एका वृद्ध म्हातारीला अर्पण केली.त्या बाईने मरेपर्यंत ती पुरून ठेवली. आम्हाला असे वाटते की, या पेटीत खय्याम यांनी या बाईला लिहिलेली पत्रे, खय्यामांच्या कविता आहेत.'

'या अशा पुराव्याने काय होणार ? खय्याम कविता करतात म्हणून दोषी ठरत नाहीत. प्रेम करतात म्हणून तर नक्कीच नाहीत.'

'महाराज, महत्त्वाची गोष्ट पुढेच आहे.' अल्-निशार म्हणाला, तुम्ही दस्तुरखद्द ही पेटी उघडा.'

'ठीक आहे' सुलतानाने खूण केली.

वझीर पुढे झाला. त्याने बराच जोर लावून त्या गंजलेल्या पेटीचे झाकण उघडले. आत अनेक ताडपत्री होती. सारख्या आकाराच्या ताडपत्री आयातांवर वेलबुट्टीसारख्या सुंदर हस्ताक्षरात अनेक ओळी लिहिलेल्या होत्या. अधून मधून भूमितीच्या आकृत्याही काढलेल्या होत्या. एका पानावर एक आयताची आकृती होती. सुलतान भुयारातून मदरसेमधे गेला तेव्हा त्याने ती आकृती पाहिली होती. फळ्यावर काढलेली. याचा स्पष्ट अर्थ ही ताडपत्री हस्तलिखिते उमरखय्याम उस्तादांची होती हे निश्चित होत होते. पण त्यावरून उमरखय्याम मुलांची अभिरुची बिघडवतात हे कसे सिद्ध होणार हेच त्याला कळत नव्हते.

तेवढ्यात सरदार अल्-निशारने एक ताडपत्र तलवारीच्या टोकाने उलटे केले. एकापाठोपाठ दुसरे केले. तिसरे... चवथे...

सुलतान आणि त्याच्या भोवतीचे लोक आश्चर्याने पाहू लागले. या ताडपत्रांच्या मागच्या बाजूला मंद गुलाबसर रंगात वेलबुट्टीची अक्षरे काढलेली होती. वझीर पुढे सरसावला. त्याने दहा-बारा ताडपत्री नीट एका ओळीत एकावर एक रचून मोठी आयताकृती केली.

आता त्या ताडपत्रातून सलग कविता स्पष्ट उमटू लागली. वझीर चुटपुटत वाचू लागला–

हा कालचा विराट पक्षी पर्युत्सुक सर्वदा
डंख मारण्या सदैव टपला खंड न त्याला जरा
या वृक्षांच्या छायेखाली तू मी आणिक सुरा
विजनवास मम क्षणात लोपे स्वर्ग बने ही धरा
चषकामागून चषक रिचवतो नदीतटी साजणी
कवितेमागून फुलवी कविता बहरे मम लेखणी
उषा उजाडून निघे कारवाँ कुठल्या जाई घरा ?
उचल सखे तू त्वरित पावले चल चल कर तू त्वरा.

'या खुदा इन्शाल्ला!' सुलतान एकदम म्हणाला.त्याचे शब्द ऐकून अल्-निशार पुढे झाला आणि म्हणाला, 'उमरखय्याम काय काय करतात हे महाराजांनी पाहिले. ज्या म्हातारीला उमरखय्याम यांनी हे हस्तलिखित दिले ती म्हातारी तरुणपणी अत्यंत लावण्यवती होती. बगदादमधल्या एका व्यापाऱ्याशी तिचे लग्न लागले. पण पुढे तिच्या तोंडावर देवी येऊन ती

अत्यंत कुरूप झाली. नवऱ्याने तिला टाकली. तिला एक मुलगी झाली आणि या मुलीला एक मुलगा झाला. त्याला मी सुलतानसाहेबांपुढे सबूत म्हणून बोलावतो.'

अल्-निशारने टाळी वाजवली. एक लहान १०-१२ वर्षाचा गोरागोमटा मुलगा पुढे झाला. सुलतान मुलाला पाहूनच दचकला. हाच तो मुलगा खय्याम उस्तादांच्या मदरसेमध्ये इतर मुलांना भूमिती शिकवत होता आणि खय्याम त्याच्याकडे अभिमानाने, कौतुकाने पहात होते.

अल्-निशार आता त्या मुलाला प्रश्न विचारणार तोच सुलतानाने हात करून त्याला थांबवले. समोरची ताडपत्री सुलटी सलग केली. आता त्या ताडपत्रांवरती एक आयताकृती दिसू लागली. त्या लहान मुलाने आकृती पाहिली आणि तो झेप घेऊन सुलतानाजवळ आला आणि अगदी निरागसपणे भडभडून बडबडत सुटला, 'खय्याम उस्तादांनी हे 'अल्जबर' चे गणित आम्हाला कळावे म्हणून भूमितीची आकृती काढून सोडवले होते.'

'पाहिलेत!' विद्वान मंडळापैकी शम्सुद्दीन जोर चढून म्हणाला. 'बीजगणिताची रचना मुलांना सोपी करून सांगण्याची ही उमरखय्याम यांची रीत पहा. अशा गुणी माणसावर जर कुणी किटाळ आणले तर....'

सुलतानाने हात वर करून म्हटले, 'थांबा!' मग मुलाजवळ जाऊन तो म्हणाला, 'बाळा, मी कवितेची ओळ तुला सांगतो:

'या वृक्षाच्या छायेखाली तू , मी आणिक सुरा' या पुढची ओळ सांग पाहू तू.'

'मी ?' मुलगा दचकून म्हणाला. 'मी कविता-बिविता कधीच वाचत नाही. उमरखय्याम उस्तादांना मुलांनी पढाईच्या काळात कविता केलेल्या, वाचलेल्या चालत नाहीत.'

सर्वजण एकमेकांकडे पाहू लागले.

अल्-निशार हळूच उठला आणि तेथून बाहेर सटकला. वझीराने ते पाहिले आणि तो चेहरा टाकून बसला.

सुलतानाच्या तीक्ष्ण नजरेतून या गोष्टी सुटल्या नव्हत्या. पण त्याकडे कानाडोळा करून त्याने मुलाच्या पाठीवरून हात फिरवत म्हटले,' तू तुझ्या आजीला ओळखतोस का ? आठवते तुला तुझी आजी कशी होती ती ?'

मुलगा एकदम रडायलाच लागला. गणित पाहून आणि भूमितीच्या आकृती पाहून तो तरतरीत झाला होता. पण आता एकदम ओक्साबोक्सी रडायला लागला. रडता रडता म्हणाला, 'मला कुणीच नाही. आजी नाही, आई नाही, अगदी पोरका आहे मी, महाराज.'

सुलतानाने दासीला खूण केली आणि म्हटले, 'जा, याला रसोईघरात नेऊन खाऊ

घाला.'

मग वझीराकडे टक लावून तो पहात राहिला आणि एकदम म्हणाला, 'वझीरजी, उमर खय्याम उस्तादांच्या विरुद्ध अल्-निशारने जी फिर्याद लावली तिचा फैसला आम्ही असा करतोय : खय्याम उस्तादांच्या दफन जागेशेजारीच या मुलाच्या आजीचे दफन बांधा. म्हातारीचे थडगे कुठे असेल ते शोधून काढा आणि ते खय्याम उस्तादांच्या वसीयतनामा केलेल्या जागी हलवा.' असे म्हणून सुलतान निघून गेला.

सुलतानाचे शब्द ऐकून वझीराचा चेहरा काळा ठिक्कर पडला. अल्-निशार सरदाराच्या नादी लागून आणि आपल्या जागी उद्या उमरखय्याम तर येणार नाहीत ना, या धास्तीतून त्याने हा व्यूह रचला होता. खय्याम आपल्या कविता एका जागी पुरून ठेवतात हे त्याला माहीत होते. त्या गोष्टीचा फायदा घेऊन आणि एका लहान पोरक्या मुलाला पकडून त्याने हा डाव टाकला होता. कुठली म्हातारी नि कुठले काय! सुलतान संदुकीतील हस्तलिखिते, दारूच्या कविता पाहून उमरखय्यामला शिक्षा करील ही अपेक्षा धुळीस मिळाली. झाले भलतेच. आता त्याचीच मान अडकली होती.

उमरखय्याम यांनी आपल्या दफनासंबंधी जो वसीयतनामा केलेला होता त्यात एका पीचच्या झाडाशिवाय जवळपास काहीही नसावे असे होते. आणि आता सुलतानाच्या आज्ञेने कुठलेही एखादे थडगे म्हातारीच्या नावाने याच जागेवर आणणे भाग होते.... डोक्यावर हाताने कपाळ दाबून धरीत वझीर बसला असताना समोरून वृद्ध उमरखय्याम येताना त्याने पाहिले. तो धावत धावत पुढे गेला आणि त्यांचे पाय धरून रहीम मागू लागला.

८९-९० वर्षांच्या परंतु अंगकाठी सरळ असणाऱ्या खय्यामनी त्याला उठवले आणि त्याचे सगळे बोलणे ऐकून हसत हसत ते म्हणाले, 'बाबा रे, मी सुलतानाला फसवणार नाही. कारण तो आपला मालीक आहे. आणि तुलाही मी फसवू शकत नाही, कारण तू माझे पाय धरलेस. म्हणून आता असे कर बागेतल्या पीचच्या झाडाजवळ माझ्या कबरीची जागा...'

'कबरीची नाही, समाधीची.' वझीर पटकन् म्हणाला.

'तेच ते. थडगे काय, कबर काय नि समाधी काय, एकच. माझ्या थडग्याशेजारी आणखी एक बांधा. यात माझी हस्तलिखिते ठेवा. अखेर माझे लिखाण गणिताचे आणि कवितांचे, हीच माझी प्रेयसी आहे. आयुष्यभर मी याच प्रेयसीच्या नादात जगतोय. माझ्या हस्तलिखितांमुळे माझ्या दफनाच्या वसियतनाम्याला धक्का लागणार नाही. थडग्यासारखे थडगे पाहून सुलतानालाही वाटेल की तू खोटे सांगितलेले नाहीस आणि तुझीही सुटका होईल. आपण एकमेकांना न फसवता स्वत:ला फसवू.'

वझीर आऽऽऽ करून विस्मयचकित दृष्टीने उमरखय्याम उस्तादांकडे पहात राहिला. त्याला ते अरेबियन नाईट्समधल्या गोष्टीतील भूतयोनीतील इफ्रितासारखे दिसू लागले.

वझीर निघणार तोचं खय्याम त्याला म्हणाले, 'वझीरजी, माणसाचे आयुष्य हे एक अल्जबरचे कोडे असते. ज्यात ज्ञात असते ते काव्य नसते, आणि काव्य असते ते ज्ञात नसते. ते काव्य हुडकण्यासाठी-

माणूस जी यातायात करतो ती
अखेर एका आयातात मातीमोल होत असते.
हेच माझे दुःख आहे, सुखही.....

❖ ❖ ❖



हरुण (न) अल् रशीद

जगाच्या विज्ञान इतिहासाचा आपण विचारू करू लागलो की प्राचीन आर्यावर्त, ग्रीक, चीन वगैरे संस्कृतीपाठोपाठ आपल्याला मध्य युगातील इस्लामी संस्कृतीचाही विचार करायला लागतो. विज्ञान इतिहासात या लोकांचा वाटा फार मोठा आहे. याच विचारवंतांनी जगाला अल्‌जिब्रा म्हणजे बीजगणित आणि अल्‌केमी म्हणजे केमिस्ट्री ही दोन शास्त्रे दिली. संस्कृत-ग्रीक-सिरीयन भाषेतील विज्ञानज्ञानाचे भाषांतर याच लोकांनी अरबीत केले म्हणून पाश्चिमात्य जगाशी ग्रीक विचारवंत 'ॲरिस्टॉटल' याची ओळख होऊ शकली. फार काय, भारताची शून्याची देणगी आणि दशमान पद्धतीही अरबांनीच जगभर जगजाहीर केली.

हरुण अल् रशीद ह्या इस्लामी परंपरेतील एक. परंतु तो स्वत: काही संशोधक नव्हता. तो होता बादशहा- खलिफा.त्याला घोड्यांचा अतोनात षोक होता. तसेच वेष पालटून सर्वसामान्य रयतेमध्ये मिसळून त्यांची दु:खे जाणून घेण्याचा आणि दु:खे निवारण्याचा त्याचा रिवाज असे. त्याची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे त्याने देशातील रुग्णांसाठी 'बिमारीस्थाने' उघडली.

बिमारीस्थान म्हणजे आजचे हॉस्पिटल. पुढे या बिमारीस्थानाला लागून कुतुबस्थाने म्हणजे वाचनालये खोलण्याची पद्धत पडली. आणि या परंपरेतूनच इस्पितळांना राजाश्रय मिळून प्रत्येक मेडिकल कॉलेज मोठ्या इस्पितळाला जोडण्याची आजची पद्धत रूढ झाली. म्हणूनच मध्ययुगातील असे 'ओयॅसिस' चे झरे पाहायचे. अल् हाझेन, अल् बिरुणी, जाबीर इब्न हय्यात, राझेस, अविसेन्ना, अल् रब्बारिझमी, अल् किंडी वगैरे विज्ञान विचारवंतांपासून थेट जगातील पहिला 'गणिती-कवी' ठरणाऱ्या उमरखय्यापर्यंतचा आलेख नजरेखालून घालायचा. तो घातला तरच विज्ञान इतिहासाचा गॅलिलिओपासून न्यूटननंतरचा प्रबोधन कालखंड आपल्याला नीट दिसू शकेल. हरुण अल् रशीद हा त्यातील एक दुवा. त्याचा हा आगळा परिचय.

■

हरुण-अल्-रशीद

खलिफा हरुण-अल्-रशीद याच्याबरोबर घोड्यांचे तबेले पहात जाणारा तो सौदागर एकेका घोड्याकडे आश्चर्याने पहात होता. खलिफा प्रत्येक घोड्याचे वय, जात, धावण्याची कुवत वगैरे गोष्टी तोंडपाठ असल्यासारखा सांगत होता. पांढरे-काळे-तपकिरी रंगाचे आणि मर्दानी शरीरयष्टीचे ते घोडे पाहताना आता सौदागर पुरा भांबावून गेला. 'उगाच आपण खलिफाला घोडा विकण्यासाठी इथे आलो. नक्षत्रासारखा एकेक घोडा घरात असताना आपला घोडा बादशहा कसा घेणार ?'

असे आता सौदागराच्या मनात येतेय तोच, "माझे हे नेहमीचे घोडे आहेत. परंतु माझा अत्यंत आवडता घोडा दाखवू ?" असे म्हणून खलिफा हरुण-अल्-रशीदने टाळी वाजवली.

टाळीच्या आवाजासरशी प्रचंड देहाचा आणि अत्यंत विद्रूप-कुरूप चेहेऱ्याचा एक काळा हबशी गुलाम पटकन समोर आला.

त्या हबशाला पाहताच सौदागर दचकला. भीतीने एक पाऊल मागे सरकला. अरेबियन नाईट्समधला अल्लाउद्दीनाच्या दिव्याचा राक्षस तर आपल्यासमोर उभा राहिला नाही ना ? असा भास त्याला झाला.

तेवढ्यात खलिफा म्हणाला, "इब्लिस, या पाहुण्यांना आपला 'खुर्दाना' घोडा दाखव."

हबशी नोकर शेजारच्या तबेल्याच्या दाराजवळ गेला. दोन हातांनी त्याने दारावरचा मलमलचा पडदा उचलला. उत्सुकतेने सौदागर पुढे झाला. खलिफाच्या मागोमाग त्या तबेल्यात शिरला आणि समोरचा घोडा पाहून अवाकच झाला. त्याच्यासमोर बलदंड प्रकृतीचा एक घोडा उभा होता. स्फटिकाहून पांढरा शुभ्र, पिंजलेल्या ढगाहून अलवार वाटावा असा हा आयाळदार घोडा खलिफाला पाहून तुतारी वाजवावी तसा खिंकाळला. खलिफाने हात फिरवून त्याची पांढरी, फेसाळ आयाळ हळूवारपणे कुरवाळली आणि म्हटले, "बेटा, ठीक आहेस ना ?"

घोड्याने पुढचा पाय वर उचलून जणू खलिफाला कुर्निसात केला.

मग खलिफा सौदागराला म्हणाला, "अशी रत्ने माझ्याकडे असताना-"

"माफ करा. अल्लाशपथ मी सांगतो माझी चूक झाली. पुन्हा या वाटेला घोडे विकायला येणार नाही."

हरुण अल् रशीद किंचित हसला आणि म्हणाला, "पण आज तू आलास. तुझी खेप मी

फुकट जाऊ देणार नाही.'' त्याने मग एक टाळी वाजवली. त्यासरशी महालाच्या एका दारातून एक लावण्यमय दासी बाहेर आली. सौदागरासमोर ती आली, खलिफाला तिने लवून कुर्निसात केला आणि कनवटीजवळून एक सोन्याचा दिनार काढून सौदागराच्या हातात दिला.

''घे. तुला नाही तरी तुझ्या घोड्याला उपयोगाला येईल. अखेर या मुक्या प्राण्यांवर आपण माणसांनीच प्रेम करायला हवे.''

हातातला दिनार पहात सौदागर ओठ चावत राहिला. मग आपल्या घोड्याजवळ तो आला आणि पटकन खलिफाला म्हणाला, ''या खुर्दाना घोड्यावर एक दिवस स्वार नाही झालो तर कंदहारी नाव लावणार नाही'' आणि असे म्हणून घोड्यावर स्वार होऊन सौदागर निघून गेला. आजूबाजूचे अरबी सरदार रागाने बेभान झाले. त्यांनी तलवारी उपसल्या. तेवढ्यात खलिफा हसून म्हणाला, ''रागाने तुम्ही या सौदागराची गर्दन छाटाल. पण मग त्याच्या घोड्याकडे कोण पाहणार ? कोण त्याची निगा राखणार ?'' खलिफाने मग दरबार बरखास्त केला.जवळच्या कारंज्याजवळ हात-पाय धुवून 'बुझ्रु' केले आणि तो नमाज पढण्यासाठी गेला.

बगदाद शहरावर सायंकाळचे सावट पडत गेले आणि हळूहळू ते शहर काळोखात पार बुडून गेले. मंदपणे चकाकणारा चंद्र बराच वर आला आणि खलिफाच्या राजवाड्यावर प्रकाशाची बरसात करू लागला.

खलिफाचा उमदा घोडा पाहून घायाळ झालेला सौदागर गावाबाहेरच्या दर्ग्यात अस्वस्थपणे पडला होता. तो एक याच गावातला मुसाफिर होता. आपण कंदहारचे व्यापारी आहोत असा फक्त बहाणा करीत असे. झालेल्या अपमानाने खिन्न होऊन तो दिवस काढत होता. बादशहाच्या मर्दानी घोड्यावर स्वार कसे व्हायचे हाच त्याला ध्यास लागला होता.

आणि तशी संधी नेमकी त्याच्यापुढे चालून आली. ती संध्याकाळची वेळ होती. काळोख दाटत होता.... बगदाद शहराबाहेरच्या गरीब लोकांच्या मोहल्ल्यापाशी उभे असताना त्याने पाहिले की, खलिफा आपल्या पांढऱ्या शुभ्र घोड्यावर स्वार होऊन रपेट करायला जात आहे. एका ताडाच्या झाडाजवळ सौदागर लपून बसला. दुरून धुळीचा ढग उठला आहे हे पाहून त्याने जमिनीवर अंग टाकले आणि छाती आपटत तो ओरडू लागला.

दौडत दौडत खलिफा त्याच्याजवळ आला तसा सौदागर अधिकच विव्हळत ओरडू लागला. खलिफा घोड्यावरून खाली उतरला. रडणाऱ्या त्या माणसाजवळ येऊन तो उभा राहिला.

"साब, एक बुंद - थेंबभर पाणी मिळेल का ? मी बिमार आहे."

"पाणी ? का नाही मिळणार ? अरबाकडे कुणी पाणी मागितले आणि त्याने पाणी दिले नाही तर अल्ला त्याला क्षमा करणार नाही." असे म्हणून खलिफा पाणी आणायला जातोय तोच सौदागराने खलिफाच्या घोड्यावर उडी मारून घोड्याला टाच मारली.

खलिफा पहातच राहिला.

मग त्याला सौदागराचे शब्द आठवले- एक दिवस या घोड्यावर स्वार नाही झालो तर....

जवळ उभ्या असलेल्या वजिराच्या घोड्यावर उडी मारून खलिफा हरुण- अल्-रशीद आता सौदागराचा पाठलाग करू लागला. सौदागराला गाठायला वेळ असा लागलाच नाही. क्षणार्धात खलिफाने त्याचे बकोटे धरून त्याला घोड्यावरून खाली खेचले.

सौदागर गयावया करू लागला.'अत दख्खल, अत दख्खल' असे म्हणत तो करुणा भाकू लागला. 'अल्ला शपथ पुन्हा असा गुन्हा करणार नाही' असे म्हणू लागला. तोच खलिफा हरुण-अल्-रशीद त्याला म्हणाला, "एका अटीवर तुला माफी करतो."

"सरकार, जे म्हणाल ते मान्य" सौदागर रडवेला होऊन म्हणाला.

"मग ऐक. हे जे घडले ते याउपर तू कोणाला सांगता कामा नये. लक्षात आले ?" खलिफा म्हणाला.

सौदागराने स्वतःच्या गालफडात मारून घेतले आणि तो म्हणाला, "जहाँपना, हे मी लोकांना कसे सांगू ? यात आपली नाचक्की आहे"

"माझी नाचक्की झाली तरी चालेल. पण जर हे तू लोकांना सांगितलेस तर लोक बिमार, रोगी नि पंगू यांच्यावर विश्वास ठेवणार नाहीत."

खलिफाचे ते शब्द ऐकून सौदागर धाडकन खलिफाच्या पायावर कोसळला. मग डबडबलेल्या डोळ्यांनी खलिफाकडे पहात तो म्हणाला, "सरकार, खोट्या रोग्याविषयीही तुम्ही इतके गहिवरून दुःखी होता, तर खरेखुरे खाटेवर तळमळणारे रोगी पाहून तुमची स्थिती किती केविलवाणी होईल ?"

"खरे रोगी ? माझ्या राज्यात रोगी नाहीत. तमाम जनता आनंदाने जगतेय," सौदागर म्हणाला, "खाविंद, तुम्ही राजवाड्यात रहाता. तुमच्याभोवती मोठेमोठे अरब सरदार, दरबारी, मानकरी असतात. पण गावाबाहेर बकाल वस्तीत एकदा तुम्ही फिरून पहाच. प्रत्येक घराघरात तीन-चार माणसे तरी छातीवर हात ठेवून खोकताना दिसतील तुम्हाला."

"अशक्य आहे," हरुण अल्-रशीद ओरडला.

इतक्यात त्या ठिकाणी खलिफाचा वजीर घोड्यावरून येऊन पोहोचला. त्याला पाहताच

खलिफा म्हणाला, "वजीर सुलतान-अल्-पहेलवी-अल्-जरबी, ऐकलेत हा काय म्हणतो ते. आपल्या राज्यात बिमार लोक जादा आहेत. खरे आहे हे ?" आता वजीराची बोबडी वळली.

सौदागराने खूण केली आणि तो खलिफाला घेऊन बगदाद शहराबाहेरील गलिच्छ वस्तीत गेला. ही गरीब लोकांची वस्ती होती. संध्याकाळी बाजारातून ओझी वाहून, हमाली करून आलेले लोक जुन्यापुराण्या झोपड्यात रात्रीचे जेवण करण्याच गर्क झालेले होते. काही लोक उंटिणी, गाढविणीचे नि बकरीचे दूध काढत होते.

"हे लोक पहा. दिवसभर राब राब राबतात. श्रीमंत अरब सरदारांकडे कामे करतात आणि चार घास गिळतात."

हरुण-अल्-रशीद पहात राहिला.

या झोपड्यांमधील प्रत्येक जण खोकत होता. खाटेवर ढसाढसा खोकत-कण्हत-कुंथत होता. त्या लोकांचे हात-पाय वाळलेल्या ताडपत्रीसारखे फिके राठ झालेले होते. बहुतेकजण मृत्युपंथाला लागलेत असे वाटत होते. एका झोपडीत चारपोरे तीन-चार खजुरांच्या आठ्यांसाठी मारामारी करीत होती.

खलिफाने एक सोन्याचा दिनार त्यांच्यापुढे केला.

पोरांची म्हातारी आजी पुढे आली. तिने तो दिनार घेतला आणि दूर फेकून दिला, "याला खतपाणी घातले तरी एकही फळ येणार नाही." असे म्हणून तिने खजुराची आठी जमिनीत खुपसली. " हे झाड उद्या उगवले तर माझे दहा नातू यावर पोट भरतील. पण ते जगले तर." खलिफा हे दृष्य पाहून सुन्न झाला.

"पाणी घातले तर झाड जगणारच,"तो म्हणाला.

"मी झाडाबद्दल नाही म्हणत. दहा नातवांबद्दल बोलतेय. दिवसभर रईस अरबांकडे काम करून ही पोरे जगणार कशी ? पाणी पिऊन माणसाला जगता येते का ?" ती म्हणाली. तिचे ते काळजाला घरे पाडणारे शब्द ऐकून खलिफाने मान खाली घातली आणि वस्तीबाहेर पडता पडता तो वजीराला म्हणाला, "उद्याच्या उद्या एक मोठे बिमारीस्थान बांधायला लागा. शंभर रोगी या बिमारीस्थानात दवा घेऊ शकतील अशी व्यवस्था करा."

"पण सरकार पैसा कुठून -"

"दरबार बोलवा. प्रत्येक अरब सरदाराला अंगावरचे दागदागिने, पैसाअडका दान करायला सांगा आणि पैसा जमेपर्यंत मला तोंड दाखवू नका." नंतर श्वास घेत तो म्हणाला, "माझा मुलगा 'अल् मोमून' याच्यासमोर पैसा गोळा करा. मी उद्या दूर जातोय हे लक्षात ठेवा." वजीर लगबग कामाला लागला. गरीब रयतेला दिलेला पैसा त्यानेही खाल्लेला होता. तो ओशाळा

झाला.

वली-काझी-मुहाफिझ अशी अनेक दरबारी बडी धेंडे नजराणा दान देण्यासाठी राजदरबारात जमली होती. खलिफाचा लहान वयाचा मुलगा अल् मोमून तख्तावर बसला होता. त्याच्यासमोर अनेक रुमाल ठेवलेले होते. ज्याचा नजराणा मोठा असेल तो प्रथम पुढे येणार. अनेक अरब सरदार स्वतःचा दिमाख-ऐश्वर्य दाखवण्यासाठी पुढे सरकू पहात होते. तोच गर्दीतून वाट काढत एक अरब सरदार पुढे आला. त्याने गळ्यातला मोत्याचा हार रुमालावर टाकला. बोटातल्या हिऱ्याच्या अंगठ्या, सोन्याचे अनेक दिनार, नाणी, रत्ने, हिरे, माणिक, मोती रुमालावर टाकले. त्या अरबापाठोपाठ अनेक अरब सरदारांनी रत्ने-सोन्याची नाणी टाकण्यासाठी गर्दी केली.

दरबार संपताना गडगंज संपत्तीने भरलेली गाठोडी घेऊन वजीर तिजोरीकडे जात होता. तो तिजोरीकडे जातोय तोच एक तलवार त्याच्यासमोर आली.

वजीर मागे बघतोय तोच त्याला दिसले की, प्रथम ज्या अरब सरदाराने रत्ने-माणके रुमालावर टाकली होती तो अरब सरदार हातात तलवार घेऊन तेथे उभा होता.

हातातले रुमालाचे बोचके सोडून त्या अरबाने आपले दागिने अंगावर घातले. गळ्यात कंठा घातला. बोटात अंगठ्या घातल्या आणि तो म्हणाला, "नव्या बिमारीस्थानासाठी पुन्हा हेच दागिने वापरावे लागतील."

शेजारी बांधलेल्या खुर्दांना घोड्यांनी खिंकाळण्याचा सप्तमजली आवाज काढला. तेव्हा कुठे त्या वजिराच्या लक्षात आले की, पहिला अरब सरदार म्हणजे आपला खलिफा- दस्तुरखुद्द हरुण-अल्-रशीद होता !

अल्जबार, अल्जबार

'मृण्मयी ऋग्वेदी' प्रकाशनाच्या 'अल्जबार, अल्जबार' ह्या पुस्तकात सहा अरेबियन शास्त्रज्ञांबद्दल आणि त्यांनी विज्ञाननिष्ठ महत्त्वाचे जे शोध लावले – ज्या ज्या शोधांची प्रक्रिया सुरू केली, त्या शोधांबद्दल कथानकाच्या माध्यमातून माहिती दिलेली आहे.

पर्यावरणाबद्दल विचार करणारा अल्हाझेन, वैद्यांचे वैद्य ॲव्हिसिन्ना, रसायनशास्त्राचे जनक जाबीर इब्न हय्यान, बीजगणित या गणित शाखेचा संस्थापक महमद इब्न मुसा अल्ख्वारिझमी, इ.स. १० व्या शतकातील प्रख्यात गणिततज्ञ उमरखय्याम, रुग्णांसाठी बिमारीस्थाने (हॉस्पिटल) सुरू करणारा कनवाळू बादशहा हरुण अल् रशीद यांच्याबद्दल ह्या पुस्तकात सर्वांना उद्बोधक शास्त्रीय ज्ञान सोप्या भाषेत वाचावयास मिळणार आहे.

मृण्मयी ऋग्वेदी
प्रकाशन